१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• मुंबई, रविवार २६ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-५२, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 52 Marathi - Daily - Mumbai, 26 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
शिवरायांबद्दल नक्की काय म्हणाले धीरेंद्र कृष्ण शास्त्री?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### महाजनांना सुनावणाऱ्या महिलेविरूध्द गुन्हा नाही

**मुंबई -** संसदेत नारी वंदन विधेयक नामंजूर झाल्याच्या निषेधार्थ मुंबईतील वरळीतील जांबोरी मैदान परिसरात काढलेल्या भाजपाच्या जनआक्रोश मोर्चावेळी भाजपाचे मंत्री गिरीश महाजनांना जाब विचारणाऱ्या महिलेविरोधात ॲड. गुणरत्न सदावर्ते यांची मुलगी झेन सदावर्ते हिने काल वरळी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिल्याचे सांगितले जात होते. मात्र त्या महिलेविरुद्ध कोणताही गुन्हा दाखल केला नसल्याची माहिती मुंबई पोलिसांनी एक्स पोस्ट करून दिली आहे. मुंबई पोलिसांनी एक्सवर लिहिले की, संबंधित महिलेच्या विरोधात कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही. सर्वांनी अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा. पोलिसांनी असा खुलासा करण्याची ही पहिलीच वेळ आहे. अशी चर्चा आहे की सदर महिलेचे पती बडे उद्योगपती असून भाजपाचे हितचिंतक आहेत. त्याचबरोबर अशीही चर्चा आहे की ही महिला भाजपाच्या केंद्रातील एका दिवंगत ज्येष्ठ नेत्याची पुतणी आहे. या दोन कारणांमुळे तिच्यावर कारवाईची शक्यता नाही.

### भाजपामध्ये प्रवेश करताच चढ्ढांचे १३ लाख फॉलोअर्स कमी

**नवी दिल्ली -** खासदार राघव चढ्ढा यांना आम आदमी पार्टी सोडून भाजपामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय विशेषत: जेन झी तरुणांना पसंत पडलेला नाही. सोशल मीडियावर लोकप्रिय असलेल्या राघव चढ्ढा यांचे अवघ्या २४ तासांत सुमारे १३ लाख फॉलोअर्स कमी झाले. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया फॉलोअर्स हे लोकप्रियतेचे मोजमाप मानले जाते. कालपर्यंत चढ्ढा यांचे इन्स्टाग्रामवर १.४६ कोटी फॉलोअर्स होते, तर आज दुपारी हा आकडा १.३३ कोटींवर आला.

# देवेंद्र फडणवीस-उद्धव ठाकरे मध्यरात्री भेटले
# चर्चा सुरू होताच फडणवीसांचा खुलासा! बातमी खोटी



**उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या वर्षा या निवासस्थानी काही दिवसांपूर्वी मध्यरात्री गुप्त भेट झाल्याच्या दाव्यामुळे आज महाराष्ट्रात खळबळ उडाली. आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाल्याची अटकळ बांधली जात असली तरी या भेटीकडे फडणवीस आणि ठाकरे यांच्यात पुन्हा संवाद सुरू होण्याच्याही दृष्टीनेही पाहिले जात आहे. यामागे एकनाथ शिंदेंना शह देण्याचे राजकारणही असू शकेल. विशेष म्हणजे, शिवसेना फुटीपूर्वी फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या भेटी मध्यरात्रीच होत असत. त्यानंतर महाराष्ट्रात सत्तांतर झाले होते. मात्र, या भेटीवरून चर्चा सुरू होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशी कोणतीच भेट झाली नाही, असा खुलासा केला.**

■ मुंबई

**प्रकाश** आंबेडकर यांच्या 'प्रबुद्ध भारत' या सोशल मीडिया हँडलने २३ एप्रिल रोजी सर्वप्रथम हा गौप्यस्फोट केला. गेल्या बुधवारी मध्यरात्री २ वाजता मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी ही भेट झाल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे, अशी पोस्ट या सोशल मीडिया अकाऊंटवरून शेअर करण्यात आली होती. नंतर एका इंग्रजी दैनिकानेही ही बातमी देताच तिची चर्चा सुरू झाली. विधान परिषद निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. १२ मे रोजी होणाऱ्या मतदानाच्या आधी सगळ्याच पक्षांकडून रणनीती आखली जात आहे. या परिस्थितीत ठाकरे-फडणवीस भेटीचा दावा करण्यात आल्याने ही केवळ औपचारिक भेट होती की, मोठ्या राजकीय समीकरणांची सुरुवात आहे, यावर तर्क-वितर्कांना उधाण आले. या भेटीवर नेत्यांनी दिलेली उत्तरे सूचक मानली जात आहेत.

या भेटीची खातरजमा करण्यासाठी आज सकाळी खा. संजय राऊत यांना प्रश्न विचारला, तेव्हा थेट उत्तर टाळून ते एवढेच म्हणाले की, या दोन नेत्यांमध्ये चर्चा झाली का, या प्रश्नाचे उत्तर तेच देतील. देवेंद्र फडणवीस यांनी या भेटीचे वृत्त स्पष्ट फेटाळले. ते म्हणाले की, अशा प्रकारची कोणतीही भेट घडलेली नाही. उद्धव ठाकरेंना जर मला भेटायचे असेल किंवा आमची भेट व्हायची असेल तर ती लपूनछपून करण्याची आवश्यकता नाही. ती अगदी उघडपणे होऊ शकते. आमच्यात असे कोणतेही विषय नाहीत, जे लपवण्याची आवश्यकता आहे. काही लोक जाणीवपूर्वक चुकीच्या पद्धतीने खोट्या बातम्या देतात, या खोटारड्या सोशल मीडिया हँडलना नोटीस बजावली जाईल.

भाजपाचे प्रवक्ते नवनाथ बन यांनीही या भेटीवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्या कथित भेटीच्या बातम्या पूर्णतः निराधार, बिनबुडाच्या आणि धादांत खोट्या आहेत.

तर 'प्रबुद्ध भारत'चे संपादक जीतरत्न पटाईत आपली बातमी खरीच असल्याचा दावा करत म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी याआधी किती लपूनछपून भेटी घेतल्या, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. अमृता फडणवीस यांनीदेखील विविध प्रसंगी त्याबाबत खुलासे केले आहे. मुख्यमंत्री म्हणत आहेत बातमी खोटी आहे. नोटीस पाठवणार आहेत. तर येऊद्या नोटीस मग बघू.

## शिवाजी महाराज व रामदास स्वामी भेटीबद्दल बागेश्वर बाबांचे वादग्रस्त वक्तव्य




**शिवाजी कोण होता, या पुस्तकावरून वाद सुरू असतानाच आता बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर वादग्रस्त वक्तव्य केले आहे. ते म्हणाले की, शिवरायांनी युद्धात थकल्यानंतर रामदास स्वामींना स्वराज्य सांभाळण्याची विनंती केली होती. या वक्तव्यानंतर शिवप्रेमींकडून बागेश्वर बाबांवर टीका होत आहे.**

■ नागपूर

**नागपूर** येथील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट परिसरात आयोजित कार्यक्रमात भारतदुर्गा मंदिराच्या शिलान्यासानंतर धर्मसभा आयोजित केली होती. सरसंघचालक मोहन भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या मंचावर उपस्थित होते. यावेळी धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज जेव्हा अनेक युद्ध करून थकले. तेव्हा ते गुरू समर्थ रामदास स्वामी यांच्याकडे गेले. शिवरायांनी आपला जिरेटोप काढला व सांगितले की, मी अनेक लढाया लढलो, पण आता पुढे लढायचे नाही. हा जिरेटोप आणि स्वराज्य आता तुम्ही सांभाळा. तुमच्या आदेशानेच आम्ही चाललो. मात्र आता आमच्याकडून युद्ध लढले जात नाही. आता आम्हाला आराम करायचा आहे. यावर हसत रामदास स्वामी म्हणाले की, ठीक आहे मी स्वीकार करतो. त्यांनी शिवरायांना तुम्ही आणि मी कोण आहोत, असा » पान २ वर

### एक मूल संघाला द्या!

बाबा बागेश्वर यांनी या कार्यक्रमात आणखीही एक वादग्रस्त वक्तव्य केले. ते म्हणाले की, देशावर संकट आल्यावर संघाचे कार्यकर्ते मदतीसाठी पुढे येतात. आपण चार मुले जन्माला घातल्यास त्यापैकी एक मूल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला द्या. ही मुले समाजकल्याणाच्या कार्यात उपयोगी पडतील.

## भारत-अमेरिका व्यापार करारावर सकारात्मक चर्चा

■ नवी दिल्ली

**भारत** आणि अमेरिका यांच्यातील बहुप्रतिक्षित द्विपक्षीय व्यापार करार अंतिम टप्प्यात असून, वॉशिंग्टनमध्ये २३ एप्रिल रोजी पार पडलेली तीन दिवसीय चर्चा 'सकारात्मक व फलदायी' ठरल्याचे संकेत मिळाले आहेत. कारण दोन्ही देशांनी हा चर्चे चा वेग कायम ठेवण्यासाठी सतत संपर्कात राहणे गरजेचे असून, यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे.

या कराराद्वारे बाजारातील प्रवेश, टॅरिफ कमी करणे आणि औद्योगिक सहकार्य वाढवण्यावर भर दिला जात आहे, ज्यामुळे दोन्ही देशांचे आर्थिक संबंध मजबूत होण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे दिली आहे. ७ फेब्रुवारी रोजी झालेल्या अंतरिम व्यापार करारानुसार भारताने अमेरिकेतून डीडीजीच्या मर्यादित आयातीला परवानगी दिली आहे.जी एकूण वापराच्या सुमारे १ टक्के आहे. यासाठी एक आराखडा निश्चित करण्यात आला होता.

## फडणवीसांनी रिक्षा, टॅक्सीवाल्यांना मराठी शिकायला मुदतवाढ दिली

■ मुंबई

**मुंबईत** रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठीच्या सक्तीच्या मुद्यावरून वाद पेटला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ मेपासून मराठी न येणाऱ्या रिक्षाचालकांचे परवाने रद्द करण्याचा इशारा दिल्यानंतर रिक्षाचालकांनी संपाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य देणे चुकीचे नाही. मात्र भाषेच्या नावावर कोणत्याही प्रकारची हिंसा मान्य केली जाणार नाही. मराठी न येणाऱ्या चालकांना मराठी शिकवली जाईल आणि कुणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. देवेंद्र फडणवीस यांनी एक प्रकारे रिक्षा, टॅक्सीवाल्यांना मराठी शिकायला मुदतवाढच दिली.

फडणवीस म्हणाले की, मुंबई आणि महाराष्ट्रात मराठी भाषेला आग्रह धरणे, मराठीला प्राधान्य द्यावे असे सांगणे यात काहीही चुकीचे नाही. पण त्याचबरोबर सरकारची अशी भूमिका असली पाहिजे की, अशा प्रकारचे वाद निर्माण होऊ नयेत. » पान २ वर

### मनसे कार्यकर्त्यांना न्यायालयीन कोठडी

काल शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते संजय निरुपम आणि मनसे कार्यकर्त्यांत वाद झाला होता. यावेळी मनसे कार्यकर्त्यांनी निरुपम यांच्या गाडीवर दगडफेक करून टायरमधील हवा काढली होती. या प्रकरणी मनसेच्या ११ कार्यकर्त्यांना आज न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. या प्रकरणी मनसेच्या तक्रारीवरून संजय निरुपम यांच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




### मुंबई-पुण्यातून गोरखपूरसाठी २४८ विशेष गाड्या सोडणार

**मुंबई -** उन्हाळी सुट्टीसाठी राज्यातील प्रवाशांच्या सोयीसाठी अतिरिक्त रेल्वे फेऱ्या सुरू करण्याची मागणी होत आहे. असे असताना मध्य रेल्वेने मुंबई आणि पुण्यातून गोरखपूरसाठी तब्बल २४८ अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्यांची घोषणा केली आहे. या निर्णयावर प्रवासी संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे.

#### मध्य रेल्वेचा पुन्हा दुजाभाव



कोरोना काळात दादर-रत्नागिरी पॅसेंजर गाडी बंद करून दादर-गोरखपूर गाडी कायमस्वरूपी चालवण्याचा निर्णय घेतल्याने यापूर्वी मध्य रेल्वेवर दुजाभावाचा आरोप झाला होता. यामुळे प्रवासी संघटना आधीच आक्रमक झाल्या आहेत. मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते गोरखपूरदरम्यान १५ मे ते १५ जुलै या कालावधीत १२४ फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. पुणे-गोरखपूर-हडपसर दरम्यान दैनिक उन्हाळी विशेष गाडीच्या आणखी १२४ फेऱ्या धावणार आहेत. उत्तर भारतातील प्रवाशांच्या सोयीसाठी गाड्यांचे नियोजन केले जात असताना महाराष्ट्रातील प्रवाशांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा संतप्त सवाल प्रवासी संघटनांकडून उपस्थित केला जात आहे.

## युद्धानंतर प्रथमच तेहरान विमानतळ कार्यरत! इराणमध्ये पुन्हा उड्डाणे सुरू

■ तेहरान

**अमेरिका** आणि इस्त्रायलसोबतच्या संघर्षानंतर सुमारे दोन महिन्यांनी इराणने इमाम खोमेनी आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून पुन्हा उड्डाणे सुरू केली आहेत. युद्धविरामाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. तेहरानहून इस्तंबूल, ओमानमधील मस्कत आणि सौदी अरेबियातील मदिना येथे उड्डाणे सुरू झाली आहेत. याआधी या महिन्याच्या सुरुवातीला अमेरिकेसोबत झालेल्या युद्धविरामामुळे इराणचे हवाई क्षेत्र अंशतः खुले करण्यात आले होते.

दरम्यान, इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अरघची यांनी ईस्लामाबाद येथे पाकिस्तानच्या राजकीय व लष्करी नेतृत्वासोबत बैठक घेतली. पाकिस्तानने अमेरिका व इराण यांच्यात संवाद सुरू ठेवण्यासाठी मध्यस्थीची भूमिका घेतली आहे. ट्रम्प यांनीही युद्धविराम चर्चेला चालना देण्यासाठी आपले प्रतिनिधी पाकिस्तानात पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, इराणने अमेरिकेसोबतचा संवाद थेट न करता पाकिस्तानमार्फतच त्यांची भूमिका मांडण्याचा निर्णय घेतला आहे. हा युद्धविराम अनिश्चित काळासाठी लागू असला, तरी त्याचा जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम दिसून येत आहे.

## बुलेट ट्रेन भूसंपादनाबाबत गोदरेजच्या दोन याचिका हायकोर्टाने फेटाळल्या

■ मुंबई

**मुंबई-**अहमदाबाद हाय स्पीड रेल कॉरिडॉर प्रकल्पासाठी (बुलेट ट्रेन) विक्रोळीतील जमिनीच्या मोबदल्यावरून सुरू असलेल्या वादात हस्तक्षेप करण्यास नकार देत मुंबई उच्च न्यायालयाने गोदरेज अँड बॉयस मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने दाखल केलेल्या दोन याचिका फेटाळून लावल्या. त्यामुळे आता भूसंपादनाच्या नुकसानभरपाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत प्राधिकरणाने यासंदर्भात दिलेल्या आदेशांविरोधात गोदरेज कंपनीने दोन याचिका दाखल केल्या



होत्या. न्या. मनीष पितळे आणि न्या. श्रीराम शिरसाट यांच्या खंडपीठासमोर या याचिकांवर एकत्रित सुनावणी झाली. प्राधिकरणाने राज्य सरकारला विलंबानंतरही उत्तर दाखल करण्याची परवानगी दिली होती.तसेच नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला (एनएचएसआरसीएल) उत्तरात सुधारणा करण्याची मुभा दिली होती. प्राधिकरणाच्या या निर्णयांना गोदरेज कंपनीने आव्हान दिले होते. विक्रोळीतील सुमारे दहा एकर जमिनीशी संबंधित हा वाद आहे. २०२२ च्या निवाड्यानुसार ही जमीन संपादित करण्यात आली होती. जमीन संपादित करण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी गोदरेज कंपनीच्या नुकसानभरपाईच्या वाढीव रकमेबाबत कायदेशीर लढाई सुरू आहे.

## स्पेनला नाटोमधून बाहेर काढा पेंटागॉनची ट्रम्प यांना सूचना

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** संरक्षण मुख्यालय असलेल्या पेंटागॉनने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाला एक ईमेल पाठवला असून, इराणविरुद्धच्या युद्धात मदत न करणाऱ्या नाटो देशांना काय शिक्षा करावी, याबद्दलचे पर्याय सुचवले आहेत. त्यामध्ये स्पेनला नाटो संघटनेतून बाहेर काढणे आणि फाल्कलँड बेटावर ब्रिटनने दावा सांगितल्याने या मुद्यावर अमेरिकेच्या धोरणाचा आढावा घेणे अशा सूचनांचा समावेश आहे.

इराणविरुद्ध इस्त्रायल आणि अमेरिकेने युद्ध छेडल्यानंतर या युद्धात नाटो संघटनेतील सदस्य राष्ट्रांनी आपल्याला मदत करावी, असे आवाहन ट्रम्प यांनी वारंवार केले होते. मात्र बहुंताश नाटो राष्ट्रांनी अमेरिकेला मदत करण्यास नकार दिला. स्पेनने तर अमेरिकेला इराणवर हल्ले » पान २ वर

## नोटबंदीमध्ये जप्त केलेल्या नोटा ग्राहकाला बदलून द्या

**नोटबंदीच्या काळात एका व्यक्तिकडून जप्त केलेल्या ५०० रुपयांच्या जुन्या नोटा बदलून देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने रिझर्व्ह बँकेले दिले.**



■ मुंबई

**नोटबंदीच्या** काळात सर्व नागरिकांना जुन्या ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा बदलून घेण्यासाठी ठराविक कालमर्यादा घालून दिली होती. या मुदतीत नोटा बदलून घेणे आवश्यक होते. त्यानंतर नोटा बदलून दिल्या जाणार नाहीत, असे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले होते.

मात्र, या खटल्यातील व्यक्तिकडून नोटबंदीच्या काळात ५०० रुपयांच्या जुन्या नोटांच्या स्वरुपात असलेले दोन लाख रुपये पोलिसांनी जप्त केले होते. हे पैसे पोलिसांनी तक्रारदाराला परत केले तेव्हा नोटा बदलून घेण्यासाठी रिझर्व्ह बँकेने दिलेली मुदत उलटून गेली होती. त्यामुळे तक्रारदाराला आपल्या जुन्या नोटा बदलून घेता आल्या नाहीत.

### हायकोर्टाचे रिझर्व्ह बँकेला आदेश

यावरून तक्रारदाराने मुंबई उच्च न्यायालयात एका याचिकेद्वारे तक्रार केली होती. या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्या. उर्मिला जोशी-फाळके आणि न्या. निवेदिता मेहता यांच्या न्यायासनासमोर नुकतीच सुनावणी झाली. त्याप्रसंगी नोटबंदीबाबत रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मुदतीआधी या नोटा पोलिसांनी जप्त केल्या होत्या. नोटा बदलण्याची मुदत संपेपर्यंत त्या नोटा पोलिसांच्या ताब्यात होत्या. त्यामुळे संबंधित व्यक्तिचा यामध्ये काहीही दोष नाही, असा स्पष्ट निर्वाळा देत न्यायालयाने तक्रारदाराला नोटा बदलून देण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेला दिले.

## कोकणातील शेतकरी पहिल्यांदा १५ मे रोजी मुंबईच्या रस्त्यावर

■ मुंबई

**गेल्या** दोन महिन्यांपासून कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकरी मदतीसाठी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

रस्त्यावर उतरून आंदोलन करत असताना राज्य सरकारने हेक्टरी २२ हजार रुपयांची मदत करून आंबा उत्पादक शेतकऱ्यांची चेष्टा केली आहे. यामुळे १५ मे रोजी गिरगांव चौपाटी ते मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी धडक मोर्चाच्या माध्यमातून सरकारला गुडघे टेकायला भाग पाडण्यासाठी कोकणातील शेतकऱ्यांसोबत

### उद्धव ठाकरेही मोर्चात सहभागी होणार

रस्त्यावर उतरणार असल्याची ठाम भूमिका शिवसेनाप्रमुख उध्दव ठाकरे यांनी घेतली.

कोकणातील आंबा बागायतदार शिष्टमंडळाने धडक मोर्चाच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली मातोश्री येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी



बोलताना शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले की, गेल्या ५० वर्षांत पहिल्यांदा कोकणातील आंबा बागायतदार शेतकरी » पान २ वर

# पनवेल पालिकेचा जागतिक हिवताप दिनानिमित्त व्यापक जनजागृती उपक्रम

■ पनवेल



**पनवेल** महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक हिवताप दिनानिमित्त आज २५ एप्रिल रोजी विविध ठिकाणी जनजागृती व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये हिवताप जनजागृती, तपासणी व मोफत उपचार यावर विशेष भर देण्यात आला असून, महानगरपालिका सातत्याने विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहिमा आणि मार्गदर्शन कार्यक्रम राबवत आले.

यानिमित्ताने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र. १२ (तळोजा फेज-२) अंतर्गत एल अँड टी सिडको बांधकाम कामगार वसाहतीत विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये मलेरिया तपासणीसाठी रक्त नमुने घेणे, तपासणी करणे तसेच हिवताप प्रतिबंधाबाबत सविस्तर जनजागृती करण्यात आली.

# निर्यात घटल्याने कांद्याचे भाव कोसळले! शेतकरी अडचणीत

■ नाशिक

**आखाती** भागात सुरू असलेल्या युद्धामुळे कांदा निर्यातीला मोठा फटका बसला. त्याचा थेट परिणाम देशांतर्गत बाजारावर झाला. निर्यात घटल्याने बाजारात कांद्याचा पुरवठा वाढला आणि दर कोसळले.


देशातील प्रमुख कांदा बाजार असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती येथे कांद्याला सरासरी केवळ १०५१ रुपये प्रति क्विंटल दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचण निर्माण झाली आहे.

# मुंबई-बडोदा मार्गावर ट्रक पुलावर आदळला

■ पालघर

**पालघर** तालुक्यातील नावझे गावाच्या हद्दीत मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गावर निमल पुलाखालून जात असताना एका ट्रकने कठड्याला धडक दिली. या अपघातात ट्रक चालक गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच तो वाहतुकीसाठी खुला होणार आहे. काम पूर्ण होण्यापूर्वीच गेल्या दोन महिन्यांत या परिसरात झालेला हा चौथा अपघात झाला आहे. वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे या महामार्गावरील सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काम सुरू असताना अवजड वाहनांच्या वेगावर नियंत्रण नसल्याचे या घटनेतून स्पष्ट होत असल्याने स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# चांदोली सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आढळला प्रथमच 'ब्लॅक पँथर'



■ कराड

**सह्याद्री** व्याघ्र प्रकल्पाच्या चांदोली राष्ट्रीय उद्यानात प्रथमच ब्लॅक पँथर म्हणजेच काळ्या बिबट्याची अर्थात मेलॅनिस्टिक लिओपर्डची नोंद झाली आहे. चांदोली राष्ट्रीय उद्यानात २० एप्रिल रोजी कॅमेरा ट्रॅपमध्ये या दुर्मीळ प्राण्याचे छायाचित्र टिपले गेले. २० आणि २१ एप्रिल रोजी वेगवेगळ्या बीटमध्ये तीन स्वतंत्र छायाचित्रे मिळाल्याने या भागात काळ्या बिबट्याची उपस्थिती निश्चित झाली आहे. यापूर्वी प्रकल्पात अशा प्रकारची नोंद कधीच झाली नव्हती.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात अनेक दुर्मीळ आणि संकटग्रस्त सस्तन प्राण्यांचा आढळ आहे. परंतु, प्रकल्पामधून यापूर्वी काळ्या रंगाच्या बिबट्याची नोंद झालेली नव्हती.मात्र,बुधवार २२ एप्रिल रोजी चांदोली राष्ट्रीय उद्यानात कॅमेरा ट्रॅप तपासण्यासाठी गेलेल्या वन कर्मचाऱ्यांना काळ्या बिबट्याचे छायाचित्र कॅमेरा ट्रॅपमध्ये टिपलेले मिळाले. २० आणि २१ एप्रिल रोजी तीन वेगवेगळी छायाचित्र ही वेगवेगळ्या बीडमध्ये टिपली गेली. त्यामुळे काळ्या बिबट्याची व्याघ्र प्रकल्पामधून पहिल्यांदाच नोंद झाली. ब्लॅक पँथर ही स्वतंत्र प्रजाती नसून एक बिबट्याचाच प्रकार आहे. शरीरात मेलानीन रंगद्रव्य जास्त असल्याने रंग पूर्ण काळा दिसतो. काळ्या रंगातही ठिपक्यांचा पॅटर्न काहीवेळा दिसतो ही अनुवंशिक अवस्था दिसते हा कोणताही आजार नाही. त्याच्या या नोंदीमळे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील जैवविविधतेला नवे महत्त्व प्राप्त झाले आहे.

# ओसी नसलेल्या इमारतींनाही पाणी वसई-विरार पालिकेचा ठराव संमत

■ विरार

**भोगवटा** प्रमाणपत्र (ओसी) नसलेल्या इमारतींनाही पाणी देण्याचा ठराव वसई विरार महापालिकेने बहुमताने मंजूर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे या ओसी नसलेल्या इमारतींना नळ जोडण्या देण्यात अडचण निर्माण झाली होती. अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) आणि बांधकाम परवागनी (सीसी) नसललेल्या इमारतींना नळ जोडण्या देऊ नये असे निर्देश डिसेंबर महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. या आदेशाची अंमलबजावणी करताना महापालिकेने नवीन नळ जोडण्या देणे बंद केले होते.

# पुरंदर विमानतळ भूसंपादनसाठी ६ हजार कोटींच्या कर्जाला हमी

राज्य सरकारची मान्यता

■ मुंबई

**पुणे** जिल्ह्यातील पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जाला महाराष्ट्र राज्य सरकारने अधिकृत हमी दिली आहे. या ६ हजार कोटींच्या कर्ज निधीतून बाधित शेतकऱ्यांना मोबदला दिला जाणार असल्याने आता विमानतळाच्या प्रलंबित भूसंपादन प्रक्रियेला गती मिळणार आहे. हे कर्ज उचलण्याची मुदत शासन निर्णय जारी झाल्यापासून १५ महिन्यांची असेल.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला अर्थात हुडको किंवा इतर वित्तीय संस्थांकडून ६ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. राज्य शासन या कर्जासाठी हमीदार असेल. पुरंदर तालुक्यातील पारगाव, खानवाडी, मुंजवाडी, एकतपूर, कुंभारवळण, वानपुरी आणि उदाचीवाडी या सात गावातील अंदाजे ३ हजार एकर जमीन संपादित केली जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ९६ टक्के शेतकऱ्यांनी जमीन देण्यास सहमती दर्शवली आहे. तसेच या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सिडको, एमआयडीसी, एमएडीसी आणि पीएमआरडीए यांचा समावेश असलेले विशेष हेतू प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे.

# नागपुरात विद्यार्थिनीला मारहाण! शिक्षिकेविरुद्ध गुन्हा दाखल

**नागपूर** - नागपूरच्या शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीला मारहाण केल्याप्रकरणी शिक्षिकेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दयानंद आर्या शाळेत घडली असून, या प्रकरणी जरीपटका पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे. संबंधित शिक्षिका फोनवर बोलत असताना विद्यार्थिनीने लघुशंकेसाठी जाण्याची परवानगी मागितली. यावरून संतापलेल्या शिक्षिकेने विद्यार्थिनीचे केस पकडून मारहाण केली. तसेच तिचे डोके बेंचवर आपटण्याचाही प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.




# केवळ संशयावरून कोणालाही दोषी ठरवता येणार नाही!

सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ मुंबई

**गुन्ह्याचा** प्रत्यक्ष किंवा तांत्रिक पुरावा नसताना केवळ संशयाच्या आधारावर कोणालाही दोषी ठरवता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सत्र न्यायालयाने दिला. अवघ्या ५०० रुपयांच्या वादातून तरुणाची हत्या केल्याचा आरोप असलेल्या दोन मजुरांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करीत न्यायालयाने हा निकाल दिला. या निर्णयाने आरोपींना दिलासा, तर सरकारी पक्षाला झटका बसला आहे.

१६ एप्रिल २०२१ रोजी वर्सोवा येथील गोमा गल्ली परिसरात ३५ वर्षीय विक्रम नावाच्या तरुणाची हत्या केल्याचा आरोप होता. याप्रकरणी वर्सोवा पोलिसांनी संदीप ऊर्फ संजित रॉय आणि घनश्याम दास या दोन मजुरांना अटक केली होती. त्यांनी जुन्या ५०० रुपयांच्या वादातून विक्रमची हत्या केल्याचा आरोप सरकारी पक्षाने केला होता. खटल्यात बचाव पक्षातर्फे ॲड. नितीन हजारे यांनी युक्तीवाद केला.

# भाईंदरच्या शासकीय रुग्णालयात पावणेदोन कोटींची मुदत संपलेली औषधे

■ भाईंदर

**भाईंदरमधील** पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात १ कोटी ६५ लाख रुपयांची मुदतबाह्य औषधे आढळून आली आहेत. भाजपा नेत्याच्या ओळखीच्या संस्थेमार्फत ही औषधे रुग्णालयाला देण्यात आली होती. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हा औषध घोटाळा उघडकीस आणून पुन्हा एकदा भाजपाला कोंडीत पकडले आहे. भाईंदरमध्ये अडीचशे खाटांचे पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालय आहे.

# डेअरी उद्योग आणि पर्यावरणावर प्रभाव २० शहरांत तरुणांचे प्रदर्शन

■ मुंबई

**वांद्रे** येथील कार्टर रोड परिसरात तरुणांनी सार्वजनिक प्रदर्शनासह रस्त्यावर उतरून डेअरीच्या पर्यावरणीय प्रभावावर आणि बीफ उद्योगाशी असलेल्या त्याच्या दुर्लक्षित बाबींवर प्रकाश टाकला. सध्या २० शहरांत तरुण दूध आणि बीफ एकाच प्राण्यापासून येते या वास्तवाकडे लक्ष वेधत आहेत आणि नागरिकांना डेअरी पुरवठा साखळीतून प्राण्यांचा प्रवास आणि अखेरीस बीफ क्षेत्रात त्यांचा प्रवेश याचा विचार करण्याचे आवाहन करत आहेत.

या प्रदर्शनातून जनतेला जगातील सर्वात मोठ्या असलेल्या भारताच्या डेअरी क्षेत्राच्या पर्यावरणीय परिणामांवर विचार करण्याचे आवाहन करण्यात आले. भारतात एक लिटर दुधाचे उत्पादन करण्यासाठी १,०७८ लिटर पाणी लागते, जो राजस्थान, उत्तर प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि पंजाब यांसारख्या प्रमुख दुग्धोत्पादक राज्यांमध्ये आधीच भूजलाच्या टंचाईचा सामना करत असलेल्या देशावरील एक गंभीर भार आहे.

# एसटीचा डिझेल खरेदी करार संपूनही नव्याने परवानगी नाही

■ मुंबई



तब्बल ५५ आगारातील वाहतूक विस्कळीत

**एसटी** महामंडळाने बीपीसीएलशी केलेला जुना डिझेल खरेदी संपला आहे. हा करार संपल्यानंतर एसटी महामंडळात मोठ्या प्रमाणात इंधनावर होणारा खर्च टाळण्यासाठी गुजरातमधून डिझेल खरेदी करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. पण राज्य सरकारच्या अर्थ खात्याने गुजरातमधून डिझेल खरेदीसाठी नव्या कराराला अद्यापि परवानगी दिली नसून डिझेल अभावी राज्यातील ५५ आगारातील वाहतूक विस्कळीत झाली असून प्रवासी व चालक या दोघांनाही त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे.

श्रीरंग बरगे यांनी सांगितले की, एसटी महामंडळाला वर्षभराच्या डिझेलसाठी सरासरी ३ हजार ४०० कोटी रुपये इतका खर्च होतो. त्यामध्ये दररोज सरासरी १० लाख ८७ हजार लिटर इतके डिझेल लागते. इंधनावर इतका खर्च होत असताना एसटीचे प्रवासी उत्पन्न मात्र जेमतेम आहे. त्यात अपेक्षित वाढ होत नसल्याने व मोठ्या प्रमाणात इंधनावर होणारा खर्च टाळण्यासाठी गुजरातमधील डिझेल खरेदी करण्याचा निर्णय एसटी महामंडळाचे अध्यक्ष व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काही दिवसांपूर्वी घेतला आहे.

कारण महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरातमध्ये मूल्यवर्धित कर कमी आहे. त्यामुळे त्यासाठी निविदाही काढण्यात आली होती. त्यानंतर सरकारच्या अर्थ खात्याकडे गुजरातमधून डिझेल खरेदी करण्याची परवानगी मागितली होती. पण अर्थ खात्यातील अधिकाऱ्यांनी त्याला अद्यापि हिरवा कंदील दाखवलेला नाही. दुसरीकडे पूर्वीची पुरवठादार कंपनी बीपीसीएलचा करार संपल्याने त्यांनी एक महिन्यापासून डिझेल देणे बंद केल्याने,फेऱ्या उशिरा जात आहेत.

# भाजपाचे राजकारण निर्लज्जपणाचे 'आप' फुटीवरून राऊतांची टीका

■ मुंबई

**आम** आदमी पार्टीचे १० पैकी ७ खासदार भाजपाने फोडले. या राजकीय घडामोडीवर भाष्य करताना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी भाजपावर घणाघाती टीका केली. राऊत म्हणाले की, भाजपाचे राजकारण निर्लज्ज या एका शब्दात वर्णन करावे असे आहे.

राऊत यांनी भाजपाला महाभारतातील बकासुराची उपमा देत म्हटले की, महाभारत या पौराणिक कथेत बकासूर नावाचा एक राक्षस होता, त्याचे पोट कितीही खाल्ले तरी भरत नसे. तीच अवस्था आता भाजपाची झाली आहे. बकासुराने पुन्हा जन्म घेतला आहे. तो आता भाजपा झाला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड यांनी काल भारताचा उल्लेख नरक असा केला होता. त्याचा संदर्भ देत राऊत म्हणाले की, ट्रम्प यांनी भारताला नरक का म्हटले, याचे कारण हे भाजपाच्या कालच्या कृतीमुळे कळले. भाजपाने भारताला नरक बनवले आहे. जे खासदार देशाचा नरक बनवणाऱ्या पक्षात गेले त्यांना लवकरच हे लक्षात येईल. आपचे खासदार अशोक मित्तल यांच्याबद्दल बोलताना राऊत म्हणाले की, राघव चड्ढा यांची हकालपट्टी केल्यानंतर आपने अशोक मित्तल यांच्यावर उपनेतेपदाची जबाबदारी सोपवली तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. मात्र लगेचच त्यांच्या ठिकाणांवर ईडीच्या धाडी पडू लागताच मित्तल घाबरले आणि थेट भाजपात दाखल झाले. माझ्यावरदेखील असाच प्रयोग झाला होता. पण मी घाबरलो नाही. मला अटक करून तुरुंगात टाकले. पक्ष सोडा म्हणून दबाव टाकला. पण मी मुळीच बधलो नाही.

# रुपारेलचा 'नाट्यांश २०२६' २७ एप्रिलला माटुंग्यात रंगणार




■ मुंबई

**माटुंग्याच्या** यशवंत नाट्य मंदिरात २७ एप्रिलच्या सोमवारी संध्याकाळी ७.०० वाजता रुपारेल नाट्य विभागाचा एकांकिका महोत्सव 'नाट्यांश २०२६' रंगणार आहे.

समकालीन विषय आणि सादरीकरणाची सहज शैली ही रुपारेलच्या एकांकिकांची खासियत असते. अशाच तीन निराळ्या विषयांवर सादर होणाऱ्या दर्जेदार एकांकिकांचे प्रयोग फक्त महाविद्यालयातील मुलांसाठीच मर्यादित न ठेवता सर्व नाट्यप्रेमी रसिक प्रेक्षकांसाठी आयोजित करण्यात आले आहेत. हा महोत्सव नाट्य विभागाचे माजी विद्यार्थी कै. रणजित पाटील आणि कै. तुषार घाडीगावकर यांना आदरांजली म्हणून समर्पित आहे. महोत्सवात रुपारेलचे माजी विद्यार्थी 'इथे नाव ठेवायला जागाच नाही' ही विलास पडळकर लिखित आणि कै. तुषार घाडीगावकर दिग्दर्शित धम्माल विनोदी सामाजिक एकांकिका सादर करणार असून, तुषार याच्यासाठी, त्याने दिग्दर्शित केलेला 'संच पुन्हा' ही एकांकिका पुनरुज्जीवित करणार आहे. याशिवाय नाट्य विभागाची सध्याची पिढी आयएनटी सर्वोत्कृष्ट संगीत विजेती 'संगीत स्वयंवर' ही अलौकिक सुरांनी सजलेली आधुनिक संगीत एकांकिका सादर करणार आहेत. इप्टा विजेती 'बेनिफिट ऑफ डाऊट' ही कंटेम्परारी विषयावरील अत्यंत रिलेटेबल आणि लोकप्रिय एकांकिका खास जेन-झी प्रेक्षकांसाठी सादर करण्यात येणार आहे.

# जळगाव-दिल्ली व्हाया इंदूर विमानसेवा २ मे पासून सुरू

■ जळगाव

**आता** अलायन्स एअर कंपनीच्या माध्यमातून जळगाव ते दिल्ली व्हाया इंदूर नवीन विमानसेवा २ मे पासून सुरू होणार आहे. या नवीन विमानसेवेचे वेळापत्रक विमानतळ व्यवस्थापनाला प्राप्त झाले आहे. गेल्या काही महिन्यांपासून जळगाव विमानतळावरून फ्लाय ९१ विमान कंपनीच्या माध्यमातून गोवा, पुणे, हैदराबाद अशी विमानसेवा सुरू आहे. तसेच अलायन्स एअर विमान कंपनीच्या माध्यमातून मुंबई आणि अहमदाबादसाठी विमानसेवा सुरू आहे. त्यानंतर आता या विमानतळावरून थेट दिल्लीपर्यंत नवीन विमानसेवा करण्याचे प्रयत्न सुरू होते. अखेर एटीआर ४२ प्रकारातील ही विमानसेवा २ मे पासून सुरू होणार आहे. हा विमान प्रवास अवघ्या काही तासांत शक्य होऊ शकेल. विमानतळ व्यवस्थापनाला मिळालेल्या वेळापत्रकानुसार, जळगाव ते दिल्ली व्हाया इंदूर ही सेवा १ ते ३१ मे कालावधीत प्रायोगिक तत्त्वावर सुरुवातीला मंगळवार, गुरुवार आणि शनिवार अशी आठवड्यातील तीन दिवस चालणार आहे. एक महिन्यासाठी सुरू होणाऱ्या विमानसेवेचा प्रतिसाद पाहून पुढील काळात तिची वारंवारता वाढवली जाईल.

पश्चिम रेल्वे

पैसे द्या आणि वापरा सर्वसाधारण प्रसाधनगृहाच्या कंत्राटाकरिता ई-लिलाव

मुंबई विभागातील सर्वसाधारण पैसे द्या आणि वापरा प्रसाधनगृहाच्या प्रचालन आणि देखभालीकरिता कंत्राटासाठी ई-लिलाव आमंत्रित करण्यात येत आहे. कॅटलॉग यापूर्वीच आयआरईपीएस वेबसाईटवर दिनांक २७.०४.२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे, त्याचे तपशील खाली दिल्यानुसार आहेत:

कंत्राटाचा प्रकार: सामान्य कंत्राट. श्रेणी: पैसे द्या आणि वापरा प्रसाधनगृहे. कंत्राटाचा कालावधी: ३ वर्षे

| लिलाव कॅटलॉग क्र.: एमएमसीटी-पीएनयूटी-२६-१६ | |
|---|---|
| स्टेशन आणि ठिकाण | कंत्राटाचा कालावधी |
| बोरीवली, दहिसर, मीरा रोड, भाईंदर, नायगाव येथे प्रसाधनगृहे. | ३ वर्षे |
| दादर, माटुंगा रोड, माहिम येथे प्रसाधनगृहे. | ३ वर्षे |
| ई-लिलावाचा दिनांक : दि. ०७.०५.२०२६ आणि ई-लिलावाची वेळ: १२.०० वा. | |

टीप: संभाव्य बोलीदारांना विनंती आहे की, त्यांनी आयआरईपीएस वेबसाईट (www.ireps.gov.in) वरील ई-लिलाव लिजिंग मॉड्युलला भेट द्यावी. लॉटनुसार तपशील तेथे उल्लेखित कॅटलॉगअंतर्गत उपलब्ध आहेत.

सुरुवातीचा कुलिंग ऑफ कालावधी ३० मिनिटांचा आहे. लागोपाठचे लॉट बंद होण्यामधील मध्यांतर १० मिनिटांचे आहे. लॉटनुसार बंद होण्याची वेळ आयआरईपीएसच्या ई-लिलाव मॉड्युलमध्ये पाहता येईल. 0030

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : X.xom/WesternRly

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३८५ किमीचे ऑप्टिकल फायबर

■ नाशिक

**जगातील** सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्यांपैकी एक असलेल्या सिंहस्थ कुंभ २०२७ चे आयोजन करण्यासाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर सज्ज झाले आहे. `कोट्यवधी भाविकांच्या व्यवस्थापनासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या निगराणी, दळणवळण आणि शहरव्यापी डिजिटल प्रणालींना ऊर्जा पुरवण्यासाठी रस्त्यांच्या खाली ३८५ किलोमीटर लांबीचे ऑप्टिकल फायबर केबल नेटवर्क टाकले जात आहे.

# एसटी आगारात बसखाली चिरडून पिता-पुत्राचा मृत्यू

■ भंडारा



**येथील** एसटी आगारात कामानिमित्त गेलेल्या एका तरुणाचा त्याच्या तीन वर्षीय चिमुकल्यासह बसखाली चिरडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना काल शुक्रवारी सायंकाळी सातच्या सुमारास घडली.

या घटनेतील मृत तरुणाचे नाव रोहित असे असून तो भंडारा शहरातील कुंभारटोली भागात राहत होता. रोहित हा दुचाकीवर बसवून एसटी आगारात आला होता. आगार परिसरात त्याने बस रॅम्पच्या मागे दुचाकी उभी केली होती, त्यावर मुलगा बसलेला होता. त्यानंतर रोहित काही कामानिमित्त थोड्या अंतरावर गेला. त्याचवेळी रॅम्पवर उभ्या असलेल्या बसच्या चालकाने बस मागे घेतली. बस पाठीमागे घेतल्याने दुचाकी आणि त्यावर बसलेला मुलगा बसच्या चाकाखाली आला. मुलगा धोक्यात आल्याचे पाहून रोहित त्याला वाचवण्यासाठी धावला, मात्र तोही बसच्या मागील चाकाखाली सापडला. यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. दरम्यान, एसटी आगारात प्रशासनाने सुरक्षा व्यवस्था वाढवून नागरिकांना डेपोमध्ये प्रवेश करण्यास मज्जाव केला आहे.






संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# यंदाच्या उन्हाच्या पर्यटनालाही झळा

**एप्रिल** महिना संपायला आला. काही शाळांचे निकाल जाहीर झाले. आठवडाभरात इतर शाळांचे निकाल जाहीर होतील. मुलांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागतील. आणि साधारणपणे जून महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यामध्ये पुन्हा नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होईल. भारतासारख्या संमिश्र हवामान असलेल्या देशात त्या त्या राज्यातील भौगोलिक परिस्थितीनुसार आणि वातावरणानुसार शैक्षणिक वर्षाची रचना केली गेलेली आहे. परंतु जवळपास सत्तर ते ऐंशी टक्के भागामध्ये मे-जून हे शाळांच्या सुट्टींचेच दिवस असतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या काळामध्ये कडक उन्हाळा असतो. गेल्या अनेक वर्षांची मे-जून महिन्यातील शाळांच्या सुट्टीची परंपरा ही शाळांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही. तर ती एक सामाजिक स्तरावरची वेगवेगळ्या पद्धतीने सुट्टी घालवण्याचाही एक भाग होऊन गेला आहे. याच काळामध्ये थंड हवेच्या ठिकाणी फेरफटका मारायला किंवा पर्यटनाला जाणाऱ्यांची संख्या मोठी असते. महाराष्ट्रासारख्या राज्याचा विचार केला तर साठ ते सत्तर टक्के लोक हे मे महिन्याच्या सुट्टीत आपापल्या नातेवाईकांकडे दाखल होत असतात. विशेषतः शहरात राहणारी मंडळी या काळात हमखासपणे ग्रामीण भागात किंवा आपल्या आजी-आजोबांकडे, मामा-मामीकडे जाऊन सुट्टीचा आनंद घेतात. अनेक घरांमध्ये हा मे महिन्याच्या सुट्टीचा परिपाठच मानला जातो. मे महिन्याची सुट्टी म्हणजे पै-पाहुणे येण्याचाच कालावधी. यानिमित्ताने का होईना, परंतु काही काळासाठी नातेवाईकांनी एकत्र येण्याचे निमित्तही साधले जाते. बदलत्या काळानुसार हल्ली कोणी कोणाकडे फारसे जात नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु आजी-आजोबा, मामा-मामी किंवा ज्याला आजोळ म्हणता येईल त्याच्याशी असलेली नाळ अजून बऱ्याच ठिकाणी घट्ट आहे. सामाजिक स्तरावर कितीही बदल झाले, उलाढाल झाली तरी कुटुंब व्यवस्थेतला हा एक महत्त्वपूर्ण पैलू ठरतो. परराज्यातून मुंबईत आलेले अनेक लोक या कालावधीत आपापल्या मूळ गावी जाऊन राहतात. उत्तर प्रदेश, बिहार किंवा दक्षिणेतल्या राज्यांमधले लोकही काही काळासाठी आपापल्या गावी जात असतात.

**यंदाच्या उन्हाळ्याचा वेगळाच करिष्मा**

यावर्षी मात्र उन्हाळ्याने आपला वेगळाच अवतार दाखवायला सुरुवात केली आहे. देशाच्या जवळपास सगळ्याच भागामध्ये चाळीस ते पंचेचाळीस डिग्री सेल्सिअसच्यावर तापमान आहे. वेधशाळांनी ते वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. याशिवाय युद्धजन्य परिस्थितीचा चित्रविचित्र परिणाम जाणवतो आहे. विशेष म्हणजे यावेळच्या उन्हाळ्यात उष्ण वाऱ्यांबरोबरच आर्द्र उष्ण वारेदेखील वाहण्याची शक्यता आहे. साधारणपणे गेल्या आठ दिवसांपासून उन्हाचा वाढता कडाका अनेक गावांमध्ये, शहरांमध्ये पाणीटंचाईचे संकट घेऊन आला आहे. खरे तर गेल्यावर्षी भरपूर पाऊस झाला होता. अनेक ठिकाणची धरणं तुडुंब भरली होती. परंतु उष्णतेचे प्रमाण अचानक वाढल्याने बाष्पीभवनामुळे बऱ्याच धरणांमधला साठा हा अगदी तीस-पस्तीस टक्क्यांवर येऊन पोहोचला आहे. अजून पूर्ण मे महिना बाकी आहे. साधारणपणे धरणं किंवा जलाशयांमधले पाण्याच्या साठ्यांचे नियोजन करताना जून अखेरीपर्यंत हे पाणी पुरवण्याचा प्रयत्न असतो. मात्र यंदा जून पूर्वीच अनेक ठिकाणची धरणं कोरडी पडण्याची भीती व्यक्त होते आहे. आज महाराष्ट्रातल्या कोणत्याही शहरात रोज पाणीपुरवठा होत नाही. आणि साठवलेले पाणी मोजून मापून वापरण्याची अनेक ठिकाणी वेळ येते आहे. स्वाभाविकपणे यावेळच्या उन्हाळ्याने अनेक शहरांमध्ये, गावांमध्ये दुपारच्या काळात अघोषित संचारबंदीच पाहायला मिळते. काही खेड्यांमध्ये तर दुपारच्या काळात शेतांमध्येही काम करणे शक्य होत नाही. बऱ्याच ठिकाणी कांदा किंवा तत्सम पिकांची काढणी ही रात्री लाईट लावून थंड वेळांमध्ये करून घेण्याची वेळ आलेली आहे. कारण या कडक उन्हात मजूर येण्यासाठी तयार होत नाहीत. या सगळ्या बदलत्या परिस्थितीचा वेगवेगळ्या स्वरूपात परिणाम दिसू लागला आहे. प्रकृती किंवा आरोग्य सांभाळणे हे अधिक महत्त्वाचे असल्याने यंदाच्या या उन्हाळ्याच्या झळा पर्यटनावरही परिणाम करताना दिसतात. मे महिन्यातले आजोळी किंवा थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचे बेत अनेकांना रद्द करावे लागत आहेत.

**शासकीय स्तरावर दखल**


शासकीय पातळीवर यावर्षीच्या उन्हाळ्याची गांभीर्याने दखल घेतली गेलेली आहे. आतापर्यंत दिल्या गेलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये गरज असेल तर दुपारच्यावेळी बाहेर पडताना उन्हापासून स्वतःचा बचाव करण्याचे आणि दर तासा-दीड तासाने पाणी पित राहण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. महाराष्ट्राच्या अनेक भागांत पाण्याची आणि चाऱ्याचीही टंचाई निर्माण होऊ लागली आहे. अगदी ज्या ठिकाणी आतापर्यंत कधीही टँकरने पाणी मागवावे लागले नाही तिथेदेखील टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो आहे. ज्या नाशिकच्या कुंभमेळ्याचे कोडकौतुक सुरू आहे. परंतु त्याच नाशिकमध्ये आतापासूनच पाणीटंचाईला सुरुवात झालेली आहे. ज्या नाशिक जिल्ह्यात राज्यातल्या सर्वाधिक नद्या आहेत, तिथे जर ही परिस्थिती असेल तर राज्याच्या इतर भागातील परिस्थिती काय असेल याचा सहज अंदाज येतो. थोडक्यात सांगायचे तर यंदाचा उन्हाळा हे नेहमीपेक्षा थोडा वेगळा आहे. आणि अनेक दैनंदिन व्यवहारांवर किंवा कार्यक्रमांना त्याच्या झळा पोहोचू लागल्या आहेत. परिस्थितीचा अंदाज घेऊन समजून उमजून प्रवास करणे हे तर गरजेचे ठरतेच. शिवाय प्रकृतीबरोबरच पाणी टंचाईची जाणीव ठेवणे तितकेच आवश्यक ठरते आहे. दरवर्षीपेक्षा जवळपास दहा ते पंधरा टक्क्यांनी गाड्यांची गर्दी कमी झालेली दिसते. इंधनाचे दर वाढल्याने खासगी बसेस आणि हवाई प्रवास महागलेला आहे. खूप लांबचा प्रवास करून पर्यटनाला जाणे बहुतांश लोक टाळताना दिसतात. दोन-चार दिवसांसाठी आणि जवळपासच्या ठिकाणी फेरफटका मारण्यावर लोकांचा भर आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

इतरांच्या सुखाशी आपली तुलना करू नका. कारण त्यांनी आयुष्यात काय दुःख भोगले आहेत याची तुम्हाला काहीच कल्पना नसते.

## पंचांग



**रविवार, २६ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
* वैशाख शुक्ल दशमी
* नक्षत्र - मघा
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० सिंह

रवी उदय- ०६-१५
रवी अस्त- १८-५८

**कालभैरव यात्रा- बुलडाणा**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)


संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### झणझणीत मटार रस्सा



★ **साहित्य:-** २५० ग्रॅम मटार फ्रेश, २ कांदे बारीक चिरून, ७ ते ८ कढीपत्ता पाने, १ टेबलस्पून आले लसूण पेस्ट, १ टेबलस्पून लाल तिखट, १ टीस्पून धणे पावडर, १ टीस्पून कांदा लसूण मसाला, १ टीस्पून गरम मसाला, मीठ चवीनुसार, १ टीस्पून गूळ पावडर, पाणी गरजेनुसार, २ ते ३ टेबलस्पून तेल, १ टीस्पून मोहरी, १/२ टीस्पून हळद, १/४ टीस्पून हिंग, कोथिंबीर

★ **कृती :-** १) फ्रेश मटार सोलून घ्या. त्यातले दाणे पाण्यात टाका. कांदा बारीक चिरून घ्या. कढई तापत ठेवा. त्यात तेल घालावे. तेल तापले की, त्यात मोहरी घाला. नंतर हिंग, हळद, आले, लसुण पेस्ट घालून परतून घ्या. कढीपत्ता पाने, कांदा खमंग परतून घ्या. नंतर त्यात धणे पावडर, गरम मसाला, कांदा लसुण मसाला, मीठ चवीनुसार, गूळ घालून १ ते २ मिनिटे खमंग परतून घ्या. थोडेसे पाणी घालावे आणि छान उकळी आणावी. २) नंतर त्यात मटार घालून परतून घ्या. पाणी थोडे घालून एकजीव करून घ्या. नंतर झाकण ठेवून शिजवून घ्या. नंतर कोथिंबीर घालावी. झाकण ठेवून परत एकदा वाफ आणावी. ३) गरम गरम झणझणीत मटार रस्सा तयार.



## क्रीडा

# पंजाबकडून विजयासह २६५ धावांचा यशस्वी पाठलाग

## दिल्लीच्या राहुलची नाबाद १५२ धावांची खेळी निष्फळ



**दिल्लीच्या अरुण जेटली क्रिकेट स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या ३५ व्या सामन्यात अपराजित पंजाब किंग्सने दिल्ली कॅपिटल्सला ६ गडी आणि ७ चेंडू शिल्लक राखून पराभूत करुन आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठ्या धावसंख्येचा पाठलाग केला. या सहाव्या विजयासह पंजाबने आयपीएलच्या गुणतालिकेतील १३ गुणांसह अव्वल स्थान अधिक भक्कम केले. के.एल.राहुलच्या नाबाद १५२ धावांच्या जोरावर दिल्लीमुळे २० षटकांत २ गडी गमावून २६४ धावा केल्या. या प्रत्युत्तरात पंजाबकडून प्रभसिमरन सिंग (७६) आणि कर्णधार श्रेयस अय्यर (नाबाद ७१) यांनी अफलातून वादळी फलंदाजी केल्यामुळे दिल्लीच्या गोलंदाजांनी लोटांगण घातले. ज्यामुळे पंजाबने १८.५ षटकांत ४ गडी गमावून २६५ धावा करत सामना जिंकला.**

■ नवी दिल्ली

**दिल्लीचा** कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, प्रथम फलंदाजी करताना दिल्लीची सुरुवात चांगली झाली नाही आणि अर्शदीप सिंगने लवकरच पथुम निस्संकाला(११) बाद केले. त्यानंतर के.एल.राहुल आणि नितीश राणाने पंजाबच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. त्यात क्षेत्ररक्षण करताना दिल्लीचा घातक गोलंदाज लुंगी न्गिडीचे डोके जखमीवर आदळले. त्यामुळे जखमी झालेल्या लुंगीला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेले. त्यामुळे १५ मिनिटे खेळ थांबवला होता. राहुलने ४७ चेंडूंत सहावे शतक पूर्ण केले. मग नितीश शतक पूर्ण करण्यापूर्वीच बाद झाला.त्याने ४४ चेंडूत ११ चौकार आणि ४ षटकारांसह ९१ धावा केल्या. या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी २२० धावांची भागीदारी केली. अखेरीस राहुलने १६ चौकार आणि ९ षटकारांसह ६७ चेंडूत नाबाद १५२ धावा केल्या. डेव्हिड मिलरने नाबाद ३ धावा करुन तंबूत परतला. त्यामुळे दिल्लीने २ बाद २६४ धावांपर्यंतच मजल मारली.

या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाबचे सलामीवीर फलंदाज प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी धडाकेबाज सुरुवात करून संघासाठी पॉवरप्ले संपण्यापूर्वीच १०० धावांचा टप्पा ओलांडला. त्यात प्रभसिमरनने दिल्लीच्या मुकेश कुमारला एकाच षटकात ६ चौकार ठोकले. मग प्रियांश अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याने १७ चेंडूत ४३ धावा केल्या होत्या.

या जोडीने पहिल्या विकेटसाठी १२६ धावांची भागीदारी केली. यानंतर कुलदीपने प्रभसिमरनला बाद करून पंजाबला दुसरा धक्का दिला. प्रभसिमरनने २६ चेंडूत ९ चौकार आणि ५ षटकारांसह ७६ धावा केल्या. त्यानंतर मुकेश कुमारने कॉनलीला जीवदान दिले होते, तो त्याचा फायदा घेऊ शकला नाही आणि १० चेंडूंत १७ धावा करून बाद झाला. विप्राज निगमने वढेराला (२५) बाद करून पंजाबला चौथा धक्का दिला. हा सामना खूपच रोमांचक स्थितीत होता. श्रेयसवरही दबाव आला. पण करुण नायरने श्रेयसचे दोनदा सोपे झेल सोडले. मग करुणने श्रेयसला दोनदा जीवदान दिले. श्रेयसने याचा पुरेपूर फायदा घेतला. त्याने अवघ्या २६ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले आणि ७ चेंडू शिल्लक असताना आपल्या संघाला विजय मिळवून दिला.

# आज चेन्नई आणि गुजरात यांच्यात काटे की टक्कर

## प्लेऑफमध्ये टिकण्यासाठी लखनौ, कोलकाता भिडणार

■ चेन्नई

आयपीएलमध्ये उद्या डबल हेडर म्हणजे दोन सामने होणार आहे. दुपारी ३.३० वाजता चेन्नईच्या एम.ए.चिदंबरम स्टेडियममध्ये होणाऱ्या आयपीएलच्या ३७ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात काटे की टक्कर होणार आहे, तर रात्री ७.३० वाजता लखनौच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियमवर ३८ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्ससमोर लखनौ सुपर जायंट्सचे आव्हान असेल. लखनौ आणि कोलकाता हे दोन्ही संघ गुणतालिकेत खालच्या स्थानावर असून, प्लेऑफच्या शर्यतीत टिकण्यासाठी हा सामना जिंकणे महत्त्वाचा आहे.

या हंगामात चेन्नईने आतापर्यंत ७ सामने खेळले आहेत. त्यातील ३ सामन्यांत चेन्नईला विजय आणि ४ सामन्यांत पराभव पत्करावा लागला. त्यामुळे चेन्नई गुणतालिकेत ६ गुणांसह ५ व्या स्थानावर आहे. गुजरातने आतापर्यंत ७ सामन्यांत आपले नशीब अजमावले आहे. त्यातील ४ सामन्यांत पराभव आणि ३ सामन्यांत गुजरातने विजय मिळवला. परिणामी गुजरात गुणतालिकेत ६ गुणांसह ६ व्या स्थानावर आहे. कोलकातानेही आतापर्यंत ७ सामने खेळले आहेत. त्यातील एकच सामना जिंकला आणि ५ सामन्यांत पराभव पत्करावा लागला. एक सामना पावसामुळे रद्द झाल्याने कोलकाता गुणतालिकेत ३ गुणांसह शेवटच्या म्हणजेच दहाव्या स्थानावर आहे. लखनौने ७ पैकी २ सामन्यांत विजय मिळवला. तर ५ सामन्यांत पराभूत व्हावे लागले. त्यामुळे लखनौ गुणतालिकेत ४ गुणांसह ९ व्या स्थानावर विराजमान आहे.

# कनिष्ठ विश्वचषक नेमबाजी स्पर्धा सेजल कांबळेला रौप्यपदक

■ कैरो

**इजिप्तमध्ये** सुरू असलेल्या आयएसएसएफच्या कनिष्ठ विश्वचषक रायफल-पिस्तुल-शॉटगन नेमबाजी चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी दर्जेदार कामगिरी करत पदक तक्त्यात आघाडीचे स्थान मिळविले. या स्पर्धेत भारताच्या प्राची गायकवाड आणि वंशिका यांनी सुवर्णपदकांची कमाई केली. याशिवाय सेजल कांबळेने रौप्य व नारायण प्रणवने कांस्यपदक मिळविले. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवसाअखेर भारताने पदक तक्त्यात आघाडीचे स्थान मिळविताना ३ सुवर्ण, ५ रौप्य आणि ३ कांस्य पदकांची कमाई केली. या स्पर्धेमध्ये गुरुवारी पहिल्या दिवशी भारताने २ सुवर्णपदके मिळविली होती.

# सूर्यवंशीने शतक ठोकूनही राजस्थानचा पराभव



■ जयपूर

**अभिषेक शर्मा** (५७)आणि ईशान किशन (७३) यांच्या वादळी भागिदारीमुळे सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सवर ५ विकेट राखून सलग चौथा विजय मिळवला. जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या ३६ व्या सामन्यात वैभव सूर्यवंशीच्या ३७ चेंडूंत १०३ धावांच्या बळावर राजस्थानने ६ बाद २२८ धावा ठोकल्या होत्या. मग हैदराबादने १८.३ षटकांत ५ बाद २२९ धावा केल्यामुळे राजस्थानला या हंगामातील तिसरा पराभव पत्करावा लागला.

हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. राजस्थानचा सलामीवीर यशस्वी जयस्वालला १० धावांवर मलिंगा धर्मसेनाने बाद केले. त्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि ध्रुव जुरेल यांनी तुफानी फटकेबाजी करून चौकार आणि षटकार ठोकले. त्यात सूर्यवंशीने ३६ चेंडूंत यंदाच्या हंगामातील दुसरे शतक लगावले. त्यानंतर तो १०३ धावा करून साकिब हुसेनच्या गोलंदाजीवर पायचित झाला. मग ध्रुव जुरेल ५१ धावा करून बाद झाल्यानंतर रियान पराग ७ धावा करून माघारी परतला. डोनोव्हन फरेरा आक्रमक ३३ धावांची खेळी करून तंबूत परतला. अखेर रवींद्र जडेजा आणि जोफ्रा आर्चर अनुक्रमे ४ आणि २ धावा करून नाबाद राहिल्यामुळे राजस्थानला ६ बाद २२८ धावांपर्यंत पोहोचता आले. या धावसंख्येचा पाठलाग करताना हैदराबादचा सलामीवीर ट्रॅव्हिस हेड हा जोफरा आर्चरला षटकार मारल्यानंतर यष्टीरक्षकाकडे झेलबाद झाला. त्यानंतर अभिषेक शर्मा आणि ईशान किशन यांनी राजस्थानच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. या जोडीने संघाची धावसंख्या १० षटकांत १ बाद १३९ वर पोहोचवली. मग अभिषेक ५७ धावांवर खेळत असताना षटकार मारण्याच्या नादात झेलबाद झाला. हेनरिक क्लासेन फटकेबाजी करताना दुसऱ्या बाजूने ईशानने चुकीचा फटका मारून विकेट फेकली. त्याने ३१ चेंडूंत ७४ धावा केल्या. नितीश रेड्डी आणि क्लासेन या जोडीसमोर आर्चरने घातक गोलंदाजी करून दबाव वाढवला. मात्र या जोडीने आक्रमक फलंदाजी केली. मग रेड्डी ३६ धावा आणि क्लासन २९ धावा करून बाद झाले. परिणामी संघाला १८.३ षटकांत विजय मिळवून दिला.

# कॅरम स्पर्धेत प्रसन्न, अमेय, ग्रीष्माची विजयी सलामी

■ मुंबई



**आनंदराव** अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्तच्या विनाशुल्क दुसऱ्या टप्प्यातील शालेय कॅरम स्पर्धेत राष्ट्रीय दर्जाचा सबज्युनियर कॅरमपटू पोद्दार अकादमी शाळेचा प्रसन्न गोळे, पार्ले टिळक विद्यालयाचा अमेय जंगम, सुळे गुरुजी शाळेची ग्रीष्मा धामणकर, चिल्ड्रेन अकॅडमी स्कूलचा राजेश सयानी आदींनी सलामीचे सामने जिंकले. अचूक खेळ करणाऱ्या प्रसन्न गोळेने समता विद्यामंदिरच्या अंश डोकेचा २५-२ असा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

दादर पश्चिम येथील सीबीईयु सभागृहामध्ये सुरू झालेल्या स्पर्धेत प्रारंभ जोरदार केल्यामुळे अमेय जंगमने उशिरा सूर सापडलेल्या महिला मंडळ शाळेच्या विराज बर्वेचे आव्हान ९-४ असे संपुष्टात आणले. सरळ जाणाऱ्या सोंगट्यांचे सातत्य राखत ग्रीष्मा धामणकरने महात्मा गांधी विद्यामंदिरच्या बलाढ्य तनया दळवीवर १७-६ असा विजय मिळविला. अन्य सामन्यात राजेश सयानीने स्वरूप शिंदेला ११-१ असे पराभूत करून पहिली फेरी जिंकली.

# आशियाई क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठीही भारत उत्सुक

**नवी दिल्ली**-राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे (२०३०) यजमानपद मिळवल्यानंतर भारताकडून २०३८ मध्ये होणार असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेकडून ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशिया संघटनेला पत्राद्वारे आशियाई क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याची इच्छा व्यक्त केली. ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशिया संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत भारतीय ऑलिम्पिक संघटनेकडून आलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली.

# कार्लोस अल्काराझची फ्रेंच ओपन स्पर्धेतून माघार

**पॅरिस** - टेनिस स्टार कार्लोस अल्काराझ फ्रेंच ओपनमध्ये खेळणार नाही. दोन वेळच्या विद्यमान विजेता अल्काराझने मनगटाच्या दुखापतीतून सावरण्यासाठी माघार घेण्याचा निर्णय घेतला. फ्रेंच ओपन १८ मेपासून सुरू होणार आहे. त्याने शुक्रवारी एक्सवर माहिती देऊन सांगितले की, संघाने ठरवले की, पूर्णपणे तंदुरुस्त झाल्याशिवाय परत येणे धोकादायक ठरू शकते.म्हणून रिकव्हरीवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. अल्काराझला याच महिन्यात बार्सिलोना ओपनच्या पहिल्या फेरीत मनगटात दुखापत झाली होती. ओटो विर्टानन विरुद्धचा सामना जिंकल्यानंतर वेदना वाढल्याने त्याने स्पर्धेतून माघार घेतली होती. १७ एप्रिलला त्याने माद्रिद मास्टर्समधूनही माघार घेतली होती, तेव्हापासूनच फ्रेंच ओपन खेळण्याबाबत अनिश्चितता होती.

देश विदेश

# युट्युबर गौतम खट्टरला अखेर हिमाचल प्रदेशमध्ये अटक

■ पणजी



**गोव्यातील** ख्रिश्चन धर्मीयांची श्रद्धा असलेल्या सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्याबद्दल अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य करून समाजात प्रक्षोभ निर्माण करणारा स्वयंघोषित धार्मिक विचारवंत, युट्यूबर गौतम खट्टर याला अखेर पाच दिवसांनंतर हिमाचल प्रदेशच्या कुलू जिल्ह्यातून स्थानिक पोलिसांनी अटक केली. खट्टरच्या संभाव्य ठिकाणाची माहिती गोवा पोलिसांनी हिमाचल प्रदेश पोलिसांना दिली होती. त्याआधारे स्थानिक पोलिसांनी खट्टरला अटक केली.

गेल्या शनिवारी गोव्यातील वास्को येथे सनातन धर्म रक्षा समितीच्या (मडगाव) वतीने भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बोलताना गौतम खट्टर याने सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्याच्या या विधानामुळे संपूर्ण गोव्यात संतापाची लाट उसळली. वास्को पोलिसांनी तातडीने खट्टर याच्याविरोधात धार्मिक भावना दुखावणे आणि समाजात द्वेष पसरवणे असे आरोप ठेवत एफआयआर दाखल केला. मात्र याची कुणकुण लागताच खट्टर फरार झाला. त्याला तत्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी हजारो लोक रस्त्यावर उतरले. शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत खट्टरला जर अटक झाली नाही तर आज गोवा बंदचा इशारा देण्यात आला होता.

# पेटीएम पेमेंट बँकेचा परवाना रिझर्व्ह बँकेने रद्द केला

■ मुंबई

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

पेटीएम पेमेंट्स बँक लिमिटेडचा बँकिंग परवाना रिझर्व्ह बँकेने रद्द केला आहे. बँकेचे कामकाज बँक आणि तिच्या ठेवीदारांच्या हिताला बाधा आणणारे असल्याचे कारणही कारवाई करताना रिझर्व्ह बँकेने दिले.

रिझर्व्ह बँकेच्या कारवाईमुळे यापुढे पेटीएम पेमेंट्स बँकेला कोणत्याही प्रकारचे बँकिंग व्यवहार करता येणार नाहीत. बँकेचे व्यवस्थापन ठेवीदारांच्या आणि सार्वजनिक हिताच्या विरोधात असल्याचे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. पेटीएम पेमेंट्स बँक बंद करण्यासाठी रिझर्व्ह बँक न्यायालयात अर्ज केला आहे. बँक बंद करण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर ठेवीदारांचे पैसे परत करण्यासाठी पेटीएम पेमेंट्स बँकेकडे पुरेशी आर्थिक क्षमता आहे.

# अमेरिका आणि चीनमध्ये २० शास्त्रज्ञ गायब-गूढ मृत्यू

■ बीजिंग

**जग** सध्या तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असतानाच अमेरिकेपाठोपाठ चीनमधून गंभीर बाब उघड झाली. २ वर्षांत चीनच्या संरक्षण आणि हायपरसोनिक क्षेपणास्त्र प्रकल्पाशी संबंधित ९ शास्त्रज्ञ संशयास्पद मृत्यू आणि गायब झाले. काही दिवसांपूर्वीच अमेरिकेने आपल्या ११ अणुशास्त्रज्ञ मृत्यू आणि गायब झाल्याची चौकशी सुरू केल्यामुळे संपूर्ण जगात खळबळ उडाली.

२०२३ ते २०२५ या कालावधीत चीनच्या हायपरसोनिक मिसाइल, ड्रोन तंत्रज्ञान आणि प्रगत रसायनशास्त्र प्रकल्पांवर काम करणाऱ्या ९ शास्त्रज्ञ गायब किंवा मृत्यू झाला. यातील तिघांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला. इतरांचा मृत्यू अज्ञात आजार किंवा संशयास्पद परिस्थितीत झाला. या मृत्यूंच्या कारणांबाबत चीनने कमालीची गुप्तता पाळली. यामुळे यामागे परकीय गुप्तचर यंत्रणांचा हात तर नाही ना? असा संशय बळावला आहे. अमेरिकेबाबत असाच एक धक्कादायक खुलासा केला होता. ३ वर्षांत अमेरिकेच्या परमाणु प्रकल्पाशी संबंधित ११ शास्त्रज्ञांचा संशयास्पद मृत्यू झाला. व्हाइट हाऊसने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले. मोठे शास्त्रज्ञ दगावूनही चीन किंवा अमेरिका यापैकी कोणीही अधिकृतपणे भाष्य करायला तयार नाही.

# इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू प्रोस्टेट कॅन्सरातून बरे झाले

■ जेरुसलेम



**अनेक** वर्षांपासून इस्त्रायलची सत्ता सांभाळणारे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी आपल्या आरोग्याबाबत धक्कादायक खुलासा केला. नेतन्याहू यांना प्रोस्टेट कॅन्सर झाल्याचे निदान झाले होते. ज्यावर गुप्तपणे उपचार घेऊन ठणठणीत बरा झालो असल्याचे त्यांनी जाहीर केले. जेरुसलेममधील हदासा रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

नेतन्याहू यांनी स्वतः ही माहिती एक्सवर पोस्ट करून जगाला दिली. त्यांनी सांगितले की, २०२४ च्या अखेरीस एका वैद्यकीय तपासणीत प्रोस्टेट कर्करोग असल्याचे आढळले होते. डॉक्टरांनी शरीरातील एक सेंटीमीटरचा छोटा ट्यूमर शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरित्या काढून टाकला. शत्रू राष्ट्रांनी या आजाराचा फायदा घेऊन इस्त्रायलविरुद्ध अफवा पसरवू नयेत, यासाठी मी ही माहिती लपवून ठेवली होती. मी आता पूर्णपणे ठणठणीत झालो आहे. कर्करोगाचा कोणताही अंश आता माझ्या शरीरात उरलेला नाही.

# पाकिस्तानने युएईचे ३.४५ अब्ज डॉलरचे कर्ज फेडले

■ कराची

**पाकिस्तानने** संयुक्त अरब अमिरातीला (युएई) ३.४५ अब्ज डॉलरच्या कर्जाची परतफेड केली असल्याची माहिती पाकिस्तानी मध्यवर्ती बँकेने एक्सवर पोस्ट करुन दिली. संयुक्त अरब अमिरातीने पाकिस्तानकडे आपल्या पैशांची परतफेड करण्याचा तगादा लावला होता.



सौदी अरेबिया आणि कतारसारख्या देशांकडून कर्ज घेऊन पाकिस्तानने संयुक्त अरब अमिरातीला ३.४५ अब्ज डॉलरचे कर्ज दोन टप्प्यांत दिले. परकीय चलन साठ्यात लक्षणीय घट होणार असली तरी राष्ट्रीय प्रतिष्ठा जपण्यासाठी देश ही किंमत मोजायला तयार असल्याचे मध्यवर्ती बँकेच्या अधिकाऱ्याने सांगितले. ही रक्कम पाकिस्तानचा व्यवहार तोल स्थिर करण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीने २०१९ मध्ये दिलेल्या बाह्य आर्थिक मदतीचा एक भाग होता. यापूर्वी मार्च महिन्यात ३.५ अब्ज डॉलरचे कर्ज पुढे ढकलण्याबाबत (रोल ओव्हर) संयुक्त अरब अमिरातीसोबत करार करण्यात पाकिस्तान अयशस्वी ठरले होते.

# राजस्थानात भंगार गोदामाला आग! ४ जण जिवंत जळाले

■ जयपूर

**राजस्थानच्या** नीमराणा परिसरातील मोलहडिया गावात भंगार गोदामाला लागलेल्या आगीत चार जण जिवंत जळाले. मृतांमध्ये दोन लहान मुलांचा समावेश असून, एक महिला गंभीर भाजली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

काल सायंकाळी सुमारे ५ वाजता भंगारात सापडलेल्या परफ्यूमच्या बाटल्या फोडताना त्यातून ज्वलनशील रसायन बाहेर पडत होते. याचवेळी भंगार घेऊन आलेल्या पिकअप चालकाने विडी पेटवून जळती काडी फेकल्याने रसायनाने पेट घेतला. काही क्षणांतच आगीच्या ज्वाळांनी संपूर्ण गोदामाला वेढले. आगीमुळे गोदामात ठेवलेल्या रासायनिक ड्रमचे स्फोट झाले. आगीच्या उंच ज्वाळा आणि दाट काळा धूर एक किलोमीटर अंतरावरून दिसत होता. आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाला सुमारे चार तास प्रयत्न करावे लागले.

घटनेवेळी गोदामात महिला, पुरुष आणि मुले अशी सुमारे सात जण उपस्थित होते. आग लागल्यानंतर जीव वाचवण्यासाठी पळापळ झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. चार तासांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. पण तोपर्यंत चार जणांचा मृत्यू झाला होता. काही जण जखमी झाले असून त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# निकालाआधीच सुनेत्रा पवार यांचे पुण्यात 'भावी मुख्यमंत्री'चे बॅनर

■ पुणे

**बारामती** पोटनिवडणुकीचा निकाल लागण्यापूर्वीच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या समर्थनार्थ पुण्यात बॅनरबाजी आणि जल्लोष करण्यात आला. पुण्यातील मार्केट यार्ड परिसरात भावी मुख्यमंत्री असा उल्लेख असलेले सुनेत्रा पवार यांचे बॅनर झळकल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.




या बॅनरवर सुनेत्रा पवार यांचा उल्लेख राज्याच्या पहिल्या महिला भावी मुख्यमंत्री असा करण्यात आला आहे. निकालाआधीच कार्यकर्त्यांनी आत्मविश्वास व्यक्त करत मध्यरात्री फटाके फोडून आनंद साजरा केला.

पिंपरी-चिंचवड परिसरातही सुनेत्रा पवार यांच्या विजयाचे बॅनर लावण्यात आले. विविध भागांत हे फलक झळकत आहेत. त्यामुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले.

# गोदा ते नर्मदा जलयात्रा फडणवीसांच्या हस्ते शुभारंभ

■ नाशिक

**पुण्यश्लोक** अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आजपासून 'गोदा ते नर्मदा जलयात्रे'च्या उत्साहास शुभारंभ झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जलयात्रेचे उद्घाटन झाले. २५ ते २९ एप्रिल या पाच दिवसांच्या कालावधीत ही जलयात्रा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला मंत्री नरहरी झिरवाळ, आ. गोपीचंद पडळकर, स्वामी समर्थ केंद्राचे गुरूमाऊली अण्णा मोरे व आखाड्यांचे साधु महंत, पदाधिकारी उपस्थित होते.

नाशिक जिल्ह्यात तापमान ४० अंशांच्या पुढे गेले असतानाही त्र्यंबकेश्वर मंदिर येथे गोदा ते नर्मदा जलयात्रेसाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. टाळ-मृदुंग, ढोल-ताशे, जलरथ आणि पालखीमुळे शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

# पुंडलिकनगरमध्ये पोलीस कर्मचाऱ्याचा शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यावर चाकूहल्ला

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर शहरातील पुंडलिकनगर परिसरात पोलीस कर्मचाऱ्याने सत्ताधारी शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यावर व त्यांच्या कुटुंबावर चाकूने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात शिंदे गटाचे उपविभागप्रमुख विकास नरवडे यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील तिघे जखमी झाले असून, या प्रकारामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

जखमी विकास नरवडे आणि आरोपी पोलीस कर्मचारी हे शेजारी असून, दोघांचीही त्या भागात तीन मजली घरे आहेत. पार्किंगसह किरकोळ कारणांवरून गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात वाद सुरू होता. या वादाचे काल रात्री तीव्र रूप धारण झाले. रात्री सुमारे ११ वाजता दोघांमध्ये पुन्हा शाब्दिक वाद झाला. वाद वाढत जाऊन शिवीगाळ झाली. त्यानंतर संतापलेल्या पोलीस कर्मचाऱ्याने आपल्या काही साथीदारांना घटनास्थळी बोलावून घेतले आणि विकास नरवडे यांच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात नरवडे यांच्या गालापासून मानेपर्यंत गंभीर जखमा झाल्या आहेत.

# भोंदू मनोहर भोसलेला फसवणूक प्रकरणी ३ दिवसांची पोलीस कोठडी

■ सोलापूर

**कुर्डूवाडी** परिसरातील तरुणाची व्यवसायात भरभराटीचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी भोंदू मनोहर भोसले आणि त्याचा साथीदार विशाल वाघमारे यांना काल अटक झाली. आज दोघांना न्यायालयात हजर केले असता माढा दिवाणी व फौजदारी त्यांना ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. भोसलेविरोधात यापूर्वीही फसवणूक, जादूटोणा आणि इतर गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

न्यायालयात आरोपींच्या वतीने ॲड. सुभाष हल्याळकर यांनी युक्तिवाद करत अटक बेकायदेशीर असल्याचा दावा केला. सरकारी पक्षाच्या वतीने जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांनी भोसले हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरोधात यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजू ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# माण तालुक्यात पाणीटंचाईचे संकट टँकरसाठी बेमुदत उपोषणाचा इशारा

**सातारा** - जिल्ह्यातील कायम दुष्काळी माण तालुक्याच्या उत्तर-पूर्व भागात उन्हाळ्याच्या झळा तीव्र होऊ लागल्या आहेत. या भागात पाणीटंचाईचे मोठे संकट उभे राहिले आहे. या भागात प्रशासनाकडून पाण्याचे टँकर सुरू करण्यास हलगर्जीपणा केला जात आहे. विशेष म्हणजे इंजबाव ग्रामपंचायतीने टँकरसाठी प्रस्ताव सादर करूनही बीडीओ आणि पाणीपुरवठा विभागाचे अभियंते याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते बापुराव कदम यांनी केला आहे. येत्या आठ दिवसांत टँकर सुरू न झाल्यास थेट बेमुदत उपोषण करण्याचा इशारा कदम यांनी दिला आहे. माणच्या उत्तर-पूर्व भागात सध्या पाण्याचे स्रोत आटल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. इंजबाव ग्रामपंचायतीने पाण्याच्या टँकरसाठी रीतसर प्रस्ताव दिला आहे, मात्र पंचायत समितीमधील अधिकारी आणि संबंधित इंजिनिअर या गंभीर प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत.

# वरळी अपघात प्रकरणातील गाडी सोडण्यास कोर्टाचा नकार

■ मुंबई

**जुलै** २०२४ मधील वरळी येथील हिट-अँड-रन प्रकरणातील बीएमडब्ल्यू गाडी परत देण्यास सत्र न्यायालयाने नकार दिला आहे. या प्रकरणात पालघरमधील एका राजकारण्याचा मुलगा मिहिर शाह हा आरोपी आहे. गाडी परत करण्यास नकार देताना पुरावे नष्ट होण्याची किंवा गैरवापराची शक्यता असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

७ जुलै २०२४ रोजी शाह याने वरळी येथे आपल्या बीएमडब्ल्यू कारने एका स्कूटरला धडक दिल्याचा आरोप आहे. या अपघातात स्कूटरचालक प्रदीप नखवा जखमी झाले, तर मागे बसलेल्या त्यांच्या पत्नी कावेरी यांना सुमारे दीड किमीपर्यंत फरफटत नेण्यात आले आणि त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर शाह फरार झाला होता. पोलिसांनी दोन दिवसांनी त्याला अटक केली. त्याच दिवशी कारमध्ये उपस्थित असलेला त्याचा चालक राजरिषी बिदावत यालाही अटक करण्यात आली.

APPENDIX – 16
[Under the Bye-law No. 35]
The Form of Notice, inviting claims or objections to the transfer of the shares and the interest of the Deceased Member in the Property of the society.

NOTICE

**Mrs. Gopi M. Sajnani**, a Member of the Grant Link Apartment Co-operative Housing Society Ltd. having, address at 35th Road, Khari Village, Khar (West), Mumbai 400 052, and holding Flat No. 401 in the building of the society, died on November 26, 2025 at San Francisco, USA without making any nomination.

The society hereby invites claims or objections from the heir/s or other claimants/ objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the property of the society within a period of **30 days** from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of such claim / objection for transfer of shares and interest of the deceased member in the property of the society. If no claims/ objections are received within the period prescribed above, the society shall be at liberty to deal with the shares and interest of the deceased member in the property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

**Place: Khar, Mumbai**
**Date: April 26, 2026**

**For and on behalf of**
**The Grant Link Apartment**
**Co-op. Housing Society Ltd**
**Sd/-**
**Secretary**

# खारेगाव खाडी उड्डाणपुल २८ एप्रिलला खुला होणार



■ ठाणे

मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगाव खाडी उड्डाणपूल मंगळवार २८ एप्रिल रोजी वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे, अशी माहिती राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे देण्यात आली.

महामार्गावर साकेत उड्डाणपुलावरील एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात आल्यानंतर आता खारेगाव खाडी उड्डाणपूलही खुला केला जात आहे. ठाणे महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गावर गेल्या काही वर्षांत वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. समृद्धी महामार्गाशी जोडणी झाल्यामुळे भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन या मार्गाचे रुंदीकरण तसेच उड्डाणपुलांची कामे हाती घेण्यात आली. खारेगाव टोलनाक्यानजीक जुन्या साकेत पुलाच्या शेजारी नवीन उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. यामुळे ठाण्याहून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी उड्डाणपूल संपल्यानंतर अरुंद रस्त्यामुळे वाहतूक पुन्हा मंदावत असल्याची स्थिती कायम आहे. आता उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले. सध्या पुलाची लोड टेस्टिंग प्रक्रिया सुरू आहे. ही चाचणी पूर्ण झाल्यानंतर तपासणी अहवाल जिल्हाधिकारी पांचाळ यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे.

# माजी मंत्री बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील आरोपीचा जामीन हायकोर्टाने फेटाळला

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने काल माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी अखिलेंद्र प्रताप सिंह याचा जामीन अर्ज फेटाळला. सिंह याने जुलै २०२५ मध्ये विशेष मकोका न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर उच्च न्यायालयात धाव घेतली होती. सरकारी पक्षाने जामिनाला विरोध करताना सांगितले की, आरोपीचे सहआरोपींशी घनिष्ठ संबंध होते आणि हत्या कट रचणे व अंमलबजावणीत त्याचा सहभाग होता. कॉल डेटा रेकॉर्डच्या आधारे सरकारी पक्षाने दावा केला की, सिंह याचा बिश्नोई गँगशी संबंधित व्यक्तींशी संपर्क होता. ही संघटित गुन्हेगारी टोळी असल्याने या प्रकरणात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सरकारी वकील तसेच पीडित कुटुंबाच्या वतीने वकील यांनी न्यायालयात सांगितले की, आरोपपत्रात आरोपीविरुद्ध प्राथमिकदृष्ट्या गुन्हा सिद्ध होईल असे पुरेसे पुरावे आहेत.

'लिज्जत' संस्थेचे सुस्थितीमधील वाहन विकणे आहे
Tata SFC.407- Mini Bus (20+1 Seaters)
MH-04-G-8431- मॉडेल २०१०
इच्छुक पार्टीने स्वतःच्या ऑफर बंद पाकिटासह प्रत्यक्ष भेटावे.
संपर्क : ९२२१०५३८२५
श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
(खादी आणि ग्रामोद्योग आयोग द्वारा मान्य)
SYMBOL OF WOMAN'S STRENGTH Lijjat
गौतम कॉम्प्लेक्स, एस. एन. वुडन पॅकिंग केस कंपाऊंड, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मिरा रोड ४०११०४, जिल्हा ठाणे.
Website : lijjat.com Email : enquiry@lijjat.com

# धारावीकरांचे २००० नंतरचेही फोटोपास सर्वेक्षणात ग्राह्य धरणार

'अनिर्णित श्रेणी' तील रहिवाशांना दिलासा!

■ मुंबई

**धारावी** प्रकल्पासाठी स्थानिक रहिवाशांनी वास्तव्याचा सबळ पुरावा म्हणून पालिकेने दिलेले फोटोपास सादर करूनही काहींना पात्रता सर्वेक्षणाच्या 'अनिर्णित' श्रेणीत टाकले आहे. मात्र आता पालिकेकडून येथील रहिवाशांना २००० सालाआधी आणि त्यानंतरही दिलेले फोटोपास हे सर्वेक्षणात ग्राह्य धरले जाणार आहेत. त्यामुळे अनिर्णित श्रेणीतील रहिवाशांना दिलासा मिळाला.

पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले की, धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी पालिकेच्यावतीने २००० आधी सर्वेक्षण प्रक्रिया राबविली. त्यावेळी रहिवाशांना सर्वेक्षण पावत्या दिल्या होत्या. मात्र, बहुतेक रहिवाशांनी आपापल्या सोयीनुसार, कालांतराने या पावत्यांचे रुपांतर फोटोपासमध्ये केले. यामुळे आधीच्या पावत्या आणि फोटोपासची तारीख यामध्ये तफावत निर्माण झाली. अशा रहिवाशांना अनिर्णित श्रेणीत टाकण्यात आले आहे.

परंतु आता पालिकेच्यावतीने धारावी पुनर्विकास प्रकल्पाला एक पत्र दिले असून यामध्ये अंतिम मुदतीनंतर म्हणजेच साल २००० नंतर पालिकेच्या वतीने वितरीत करण्यात आलेले फोटोपासदेखील ग्राह्य धरता येतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अनिर्णित श्रेणीत असलेल्या रहिवाशांना दिलासा मिळाला आहे.

# नांदेड-बिदर रेल्वेचा प्रकल्प राबविण्यास कर्नाटकचा नकार

■ नांदेड

**नांदेड**-बिदर रेल्वे प्रकल्पासाठी कर्नाटक सरकारने ५० टक्के खर्च उचलण्यास नकार दिल्याने १५७ किमीचा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भवितव्य टांगणीला लागले आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकला जोडणाऱ्या या रेल्वे मार्गामुळे शीख तीर्थक्षेत्रे जोडली जाणार होती. नुकतीच जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती'दिशा' ची बैठक पार पडली. या बैठकीत रेल्वे विभागाच्या पायाभूत सुविधांच्या प्रगतीबाबतच्या अहवालातून ही धक्कादायक माहिती समोर आली. नांदेड-बिदर रेल्वे मार्गासाठी राज्यातील महायुती सरकारने ५ फेब्रुवारी २०२४ रोजी आपल्या वाट्याचा ५० टक्के खर्च उचलण्याबाबतचा निर्णय घेतला होता.

सार्वजनिक सूचना

याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, सुंदरलाल भटवाडी SRA CHS Ltd, अंधेरी , PAP वाटपांतर्गत (जी मूळतः शास्त्री नगर SRA CHS Limited, वांद्रे पूर्व, CTS क्र. ६२९ या संस्थेची सदस्या आहे) या संस्थेची सदस्य असलेल्या श्रीमती चनम्मा नरसन्ना जेकापल्लू यांचे दिनांक ३१/०३/२०२६ रोजी निधन झाले. तसेच, त्यांचे पती यांचेही मृत्युपत्र न करता (intestate) निधन झाले आहे; त्यामुळे, त्यांचे कायदेशीर वारसदार असलेले पुत्र श्री. आनंद नरसन्ना जेकापल्लू यांनी सदनिका क्रमांक A-1602, स्वत:चा नावावर कायमस्वरूपी हस्तांतरण करण्यासाठी अर्ज केला आहे. सबब, सदर मालमत्तेबाबत कोणाचाही काही आक्षेप किंवा दावा असल्यास, कृपया ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संपर्क साधावा. या कालावधीत कोणतेही दावे किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, सदर सदनिका त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यास सोसायटी मुक्त असेल.

**सही/-**
**अध्यक्ष/सचिव,**
**सुंदरलाल भटवाडी CHS Ltd , ओल्ड नगरदास रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-400069.यांच्या वतीने आणि त्यांच्यासाठी,**
**(त्यांचे वकील ॲड. दिनेश एल. विश्वकर्मा यांच्याशी ९३२०७८९३०० या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा advocate.dineshvishwakarma@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा.)**

मध्य रेल्वे
विविध कामे

**खुली ई-निविदा सूचना क्र.**- केवायएन-एलडी-५८३-पी-रेव्ह-२६-२७-०१, दिनांक: २३.०४.२०२६. **कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील कल्याण व लोणावळा जिल्ह्यांतील टीआरडी स्थापने आणि एफओबी साठी निरीक्षण प्रणालीचे पुरवठा, उभारणी, स्थापना, चाचणी, कार्यान्वयन व देखभाल. **अंदाजित मूल्य:** रु. ४९,७८,५३३/- **इरठे :** रु. ९९,६००/- **निविदा अर्जाची किंमत:** ०.०० **पूर्ततेचा कालावधी:** ३६ महिने. निविदा सादर करण्याची वेळ आणि दिनांक २२.०५.२०२६ रोजी ११:०० वाजेपर्यंत असेल. ई-निविदेचा संपूर्ण तपशील रेल्वेच्या अधिकृत वेबसाईटवर http://www.ireps.gov.in उपलब्ध आहे; तसेच, संपूर्ण कागदपत्रे या वेबसाईटवरून डाउनलोड करता येतील. निविदेचा तपशील कल्याण येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (क.वि.), केवायएन यांच्या कार्यालयाच्या 'सूचना फलकावर' उपलब्ध आहे. DE-87

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

मध्य रेल्वे
पुरवठा आणि बसवण्याचे काम

**खुली निविदा सूचना क्र.** - सीआर-एमयूएम०एमईसीएच(एमझेडसीओ)/१२/२०२६आर दिनांक: २३.०४.२०२६ **कामाचे नाव:** माझगाव कोचिंग डेपो येथील रेल्वे डब्यांमधील बायो-टॉयलेट्सच्या देखभालीच्या कामांतर्गत 'एफ-टाईप' ब्रॅकेटचा पुरवठा आणि बसवण्याचे काम. **कामाचा अंदाजित खर्च:** रु. २७,९९,१४९/- (रुपये सत्तावीस लाख नव्याण्णव हजार एकशे एकोणपन्नास फक्त), **इसारा रक्कम:** रु.५६,०००/- (रुपये छप्पन्न हजार फक्त), **निविदा अर्जाची किंमत:** निरंक, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** १५.०५.२०२६ रोजी १५:०० वा. निविदा केवळ www.ireps.gov.in या वेबसाईटद्वारे ई-निविदा स्वरूपातच स्वीकारल्या जातील. निविदा दस्तऐवज वेबसाईटवर उपलब्ध आहे. DE-88

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

तंत्रज्ञान विश्वातील महाकाय कंपनी असलेल्या 'ॲपल'ने नुकतीच आपल्या नेतृत्व बदलाची घोषणा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. गेल्या दीड दशकापासून ॲपलला जागतिक बाजारपेठेत सर्वोच्च स्थानी नेऊन ठेवणारे टिम कूक आता मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदावरून पायउतार होत असून, त्यांच्या जागी जॉन टर्नस यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही एका नव्या युगाची ती नांदी मानली जात आहे. कूक यांच्या कार्यकाळात कंपनीचे बाजार मूल्य ३५० अब्ज डॉलर्सवरून तब्बल ४ ट्रिलियन डॉलर्सच्या पार गेले, जे कोणत्याही जागतिक कंपनीसाठी एक स्वप्नवत यश आहे. जॉन टर्नस यांच्यासमोरही आव्हानांचे मोठे डोंगर उभे आहेत. सध्याच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे तंत्रज्ञान जगाची दिशा ठरवत आहे. मायक्रोसॉफ्ट आणि गुगलसारख्या कंपन्या एआय क्षेत्रात वेगाने पुढे जात असताना ॲपलला या शर्यतीत आपले वर्चस्व सिद्ध करावे लागेल.

# नेतृत्वाचे नवे युग



**कॉर्पोरेट** जगतामध्ये टीम लीडर बदलणे ही बाब सामान्य असते. अलीकडील काळात कंपनीचे सीईओही वरचेवर बदलत असल्याचे दिसून आले आहे. असे असताना 'ॲपल'च्या टीम कूक यांच्या निवृत्तीची आणि त्यांच्या जागी आलेल्या जॉन टर्नस यांची इतकी चर्चा होण्याचे कारण काय, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. पण त्याचे प्रमुख कारण म्हणजे ॲपल या महाकाय कंपनीचा अवाढव्य पसारा आणि तो निर्माण करण्यामध्ये टीम कूक यांनी दिलेले योगदान. ॲपल ही जगातील सर्वात मोठी आणि प्रभावशाली तंत्रज्ञान कंपनी असून तिची स्थापना १ एप्रिल १९७६ रोजी स्टीव्ह जॉब्स, स्टीव्ह वोझ्नियाक आणि रोनाल्ड वेन यांनी केली. आज ही कंपनी केवळ आयफोनसाठीच नाही, तर मॅक कॉम्प्युटर, आयपॅड, ॲपल वॉच आणि विविध सॉफ्टवेअर सेवांसाठी जागतिक स्तरावर ओळखली जाते. आर्थिक कामगिरीच्या बाबतीत ॲपलने नवे विक्रम प्रस्थापित केले असून, २०२५ च्या आर्थिक वर्षात कंपनीची वार्षिक उलाढाल ४१६ अब्ज डॉलर्स इतकी नोंदवण्यात आली होती. चालू वर्षीच्या पहिल्या तिमाहीत कंपनीने १४३.८ अब्ज डॉलर्सचा विक्रमी महसूल मिळवला असून, त्यात आयफोन विक्रीचा वाटा सर्वाधिक म्हणजेच ८५.३ अब्ज डॉलर्स इतका आहे. आज जगभरातील २७ हून अधिक देशांमध्ये ॲपलचे ५४० पेक्षा जास्त स्वतःचे रिटेल स्टोअर्स अर्थात आऊटलेट्स आहेत. सध्या जगभरात ॲपलची २.५ अब्जाहून अधिक सक्रिय उपकरणे वापरली जात आहेत. २०११ मध्ये ज्यावेळी स्टीव्ह जॉब्ज यांच्या निधनानंतर टिम कूक यांनी कंपनीची सूत्रे हाती घेतली, तेव्हा त्यांच्यासमोर एक उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा वारसा पुढे नेण्याचे मोठे आव्हान होते. तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक दिग्गजांना कूक हे आव्हान पेलू शकतील की नाही, अशी शंका होती. मात्र, मागील १४ वर्षांच्या काळात कूक यांनी केवळ स्वतःला सिद्धच केले नाही, तर ॲपलला अशा उंचीवर नेऊन ठेवले की, जिथे पोहोचणे कोणत्याही कंपनीसाठी स्वप्नवत आहे. वयाच्या ६५ व्या वर्षी टिम कूक यांनी आता निवृत्तीची घोषणा केली असून, येत्या सप्टेंबर महिन्यात ते आपले पद सोडणार आहेत. त्यांच्या जागी जॉन टर्नस हे नवे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून धुरा सांभाळणार आहेत; तर कूक हे 'एमेरिटस' म्हणजेच कार्याध्यक्ष म्हणून मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहतील.

टिम कूक यांची सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे त्यांनी ॲपलमध्ये राबवलेली वारसाहक्क प्रक्रिया. कॉर्पोरेट विश्वात अनेकदा मोठ्या नेत्यांच्या निवृत्तीनंतर कंपन्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होते. परंतु कूक यांनी अत्यंत शांतपणे आणि नियोजित पद्धतीने ही प्रक्रिया राबवली आहे. स्टीव्ह जॉब्ज हे एक दूरदृष्टी असलेले निर्माते होते, तर टिम कूक हे एक निष्णात व्यवस्थापक ठरले. जॉब्ज यांच्या काळात ॲपलचे बाजारमूल्य ३५० अब्ज डॉलर्स होते; पण कूक यांच्या कार्यकाळात ते तब्बल ३.९ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचले. जगातील पहिली १ ट्रिलियन आणि त्यानंतर २ ट्रिलियन डॉलर्सची कंपनी बनण्याचा मान ॲपलला कूक यांच्या नेतृत्वाखालीच मिळाला. त्यांनी केवळ उत्पादनांवर लक्ष केंद्रित न करता, कंपनीच्या पुरवठा साखळीत आणि आर्थिक नियोजनात केलेल्या बदलांमुळेच ॲपल आज ५० वर्षांची होऊनही अधिक मजबूत स्थितीत उभी आहे. जॉब्स हे त्यांच्या क्रांतिकारक कल्पनांसाठी आणि उत्पादनांच्या रचनेसाठी ओळखले जात, तर कूक यांनी त्यांच्या व्यावहारिक दृष्टिकोनातून ॲपलचा जागतिक विस्तार केला. त्यांनी केवळ आयफोनवर अवलंबून न राहता ॲपल वॉच, एअरपॉड्स आणि सेवा क्षेत्रातील (ॲप स्टोअर, आयक्लाऊड, ॲपल म्युझिक) महसूल वाढवण्यावर भर दिला. त्यांच्याच काळात ॲपलने उत्पादनासाठी चीनवरील अवलंबित्व कमी करून भारतासारख्या देशांत आपली पाळेमुळे घट्ट केली. कूक यांच्या काळात ॲपलने केवळ जुन्या उत्पादनांमध्ये सुधारणा करतानाच काही नवीन श्रेणीही यशस्वीपणे सादर केल्या. यामध्ये 'ॲपल वॉच'चे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. २०१४ मध्ये सादर करण्यात आलेले हे घड्याळ आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय वेअरेबल डिव्हाईस बनले आहे. कूक यांनी बीट्स कंपनीचे केलेले अधिग्रहण हे त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात धाडसी निर्णयांपैकी एक मानले जाते. 'ॲपल टीव्ही प्लस' या स्ट्रीमिंग सेवेद्वारे कंपनीने हॉलिवूडमध्ये आपले स्थान निर्माण केले.


गणेश काळे, संगणकतज्ज्ञ

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या शर्यतीत ॲपल मागे पडल्याची टीका अनेकदा झाली. गुगल आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या कंपन्यांनी जेव्हा एआयमध्ये मोठी गुंतवणूक केली, तेव्हा कूक यांनी सावध पवित्रा घेतला होता. त्यांनी घाई करण्याऐवजी ग्राहकांच्या गोपनीयतेला आणि सुरक्षेला प्राधान्य देत 'ॲपल इंटेलिजन्स' सादर केले. तंत्रज्ञान हे केवळ दाखवण्यासाठी नसावे, तर ते लोकांच्या दैनंदिन जीवनात सुरक्षितपणे सामावून घेणारे असावे. येणाऱ्या काळात जेव्हा एआय-सज्ज एम-५ चिप्स बाजारात येतील, तेव्हा कूक यांची ही दीर्घकालीन रणनीती किती योग्य होती, हे स्पष्ट होईल. एका महान नेत्याच्या सावलीतून बाहेर पडून स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणे आणि कंपनीला यशाच्या शिखरावर नेणे, हेच टिम कूक यांचे सर्वात मोठे यश आहे. जॉन टर्नस यांच्याकडे सूत्रे सोपवताना कूक यांनी एक असा वारसा मागे ठेवला आहे, जो पुढील अनेक दशके तंत्रज्ञान विश्वावर आपली मोहोर उमटवत राहील. नवे सीईओ जॉन टर्नस हा ॲपलसाठी नवा चेहरा नाही. गेल्या २५ वर्षांपासून ते कंपनीच्या संशोधन आणि विकास विभागात महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. १९९७ मध्ये पेनसिल्व्हेनिया विद्यापीठातून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतल्यानंतर, २००१ मध्ये ते ॲपलमध्ये रुजू झाले. त्यांनी आयफोन, आयपॅड आणि मॅक यांसारख्या प्रमुख उत्पादनांच्या हार्डवेअर इंजिनिअरिंगचे नेतृत्व केले आहे. विशेषतः ॲपलच्या स्वतःच्या 'एम-सीरीज' चिप्स (ॲपल सिलिकॉन) विकसित करण्यात टर्नस यांचा सिंहाचा वाटा मानला जातो. कूक यांच्या तुलनेत टर्नस हे उत्पादनांच्या तांत्रिक रचनेत अधिक खोलवर गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना 'द आर्किटेक्ट' असेही म्हटले जाते. टर्नस यांच्यासमोर भविष्यातील आव्हाने मोठी आहेत. सध्या संपूर्ण जग कृत्रिम प्रज्ञा (एआय) आणि प्रगत सॉफ्टवेअरच्या दिशेने वेगाने बदलत आहे. गुगल आणि मेटा सारख्या कंपन्यांनी एआय क्षेत्रात मोठी झेप घेतली असताना, ॲपलला या स्पर्धेत आपले स्थान टिकवून ठेवावे लागेल. तसेच, व्हिजन प्रो सारख्या नवीन उपकरणांना बाजारपेठेत यश मिळवून देणे आणि फोल्डेबल फोनच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद देणे, ही टर्नस यांची मुख्य परीक्षा असेल. कूक यांनी कंपनीला आर्थिकदृष्ट्या स्थिर आणि अवाढव्य बनवले. आता टर्नस यांना स्टीव्ह जॉब्स यांच्या काळात असणारा तंत्रज्ञानातील नाविन्याचा जोश पुन्हा निर्माण करावा लागेल. त्यांची कार्यशैली ही कूक यांच्याप्रमाणेच शांत आणि संयमी मानली जाते. ते सहकाऱ्यांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. कूक यांनी टर्नस यांच्याबद्दल गौरवपूर्ण उद्गार काढताना म्हटले आहे की, त्यांच्याकडे इंजिनिअरचे डोके आणि नाविन्यपूर्ण शोध लावणाऱ्याचा आत्मा आहे. ॲपलसारख्या महाकाय जहाजाचे सुकाणू हाती घेतल्यानंतर टर्नस तंत्रज्ञान आणि व्यापार यांचा समतोल साधत ॲपलची मक्तेदारी कशी टिकवतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. आयफोनमध्ये एआयचा वापर कशा प्रकारे प्रभावीपणे करता येईल आणि वापरकर्त्यांचा अनुभव कसा बदलता येईल, हे टर्नस यांच्यासमोरील सर्वात मोठे तांत्रिक आव्हान असेल. याशिवाय, जागतिक राजकारणातील अस्थिरता आणि चीनसोबतचे व्यापार संबंध हे देखील एक महत्त्वाचे आव्हान आहे. ॲपलचा बराचसा पुरवठा साखळीचा भाग चीनवर अवलंबून असल्याने, इतर देशांमध्ये उत्पादनाचे पर्याय शोधणे आणि ते यशस्वी करणे ही टर्नस यांच्यासाठी तारेवरची कसरत ठरेल.

>>> रविवार विशेष

# 'फ्लेक्स फ्युएल'चा पर्याय कशासाठी?

**पश्चिम आशियातील संघर्षाची इतिश्री कधी व्हायची तेव्हा होवो; पण या युद्धाने भारतासह जगाला इंधनावरील अवलंबित्वाबाबत खडाडून जागे केले आहे. विशेषतः आपल्या गरजेच्या ७५ टक्क्यांहून अधिक कच्च्या तेलाची आयात करणाऱ्या भारतासाठी या युद्धाने एक मोठा धडा दिला आहे. हा धडा म्हणजे आयात इंधनावरचे अवलंबित्व कमी करत पर्यायी स्रोतांचा वापर वाढवणे. याहृष्टीने केंद्र सरकारने 'फ्लेक्स-फ्युएल' वाहनांना (एफएफव्ही) प्रोत्साहन देण्याचे धोरण आक्रमकपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ८५ टक्के इथेनॉल आणि १५ टक्के पेट्रोल अशा 'ई-८५' मिश्रणावर चालू शकणाऱ्या या वाहनांमुळे भारताचे परकीय इंधनावरील अवलंबित्व लक्षणीयरित्या कमी होण्याची चिन्हे आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे पर्यायी ऊर्जावापराबाबत अधिक आग्रही असून, त्यांनी १०० टक्के इथेनॉलवर धावणाऱ्या गाड्या आणण्याबाबत सूतोवाच केले आहे. तसेच वाहन कंपन्यांना आगामी काळात या बदलासाठी तयार राहण्यासही सांगितले आहे. त्यापूर्वीचा टप्पा म्हणून ई ८५ धोरणाकडे पाहावे लागेल.**

दुसरे कारण म्हणजे कोणत्याही इंधनाची कार्यक्षमता ही त्याच्या घनतेवर अवलंबून असते. इथेनॉलची ऊर्जा घनता पेट्रोलच्या तुलनेत सुमारे ३० ते ३५ टक्क्यांनी कमी असते. याचा थेट परिणाम वाहनांच्या मायलेजवर होतो. एखादे वाहन शंभर टक्के इथेनॉलवर चालवले, तर ते एका लिटरमध्ये पेट्रोलच्या तुलनेत खूपच कमी अंतर कापू शकेल. इथेनॉलचा 'ऑक्टेन रेटिंग' जास्त असल्याने इंजिनमध्ये त्याचे ज्वलन अतिशय सुरळीत होते, ही जमेची बाजू असली तरी, या फायद्याचा पूर्ण लाभ घेण्यासाठी इंजिनची रचना मुळापासून बदलावी लागते. सध्या भारतातील बहुतांश वाहने ही केवळ पेट्रोलवर चालण्यासाठी तयार केलेली आहेत. त्यामुळे शंभर टक्के इथेनॉल वापरणे सध्याच्या परिस्थितीत काहीसे कठीण ठरणारे आहे.

पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉल हे अधिक क्षरणकारक म्हणजेच धातू आणि रबर खाणारे असते. सामान्य इंजिनमध्ये शंभर टक्के इथेनॉल वापरल्यास इंधन प्रणालीमधील रबर, प्लास्टिक आणि काही विशेष धातूंचे भाग वेगाने खराब होऊ लागतात. तसेच, इथेनॉलला इंजिनमध्ये पोहोचवण्यासाठी जास्त प्रवाहाची गरज असते. यासाठी इंधन पंपाची क्षमता वाढवावी लागते. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे थंडीच्या दिवसात इंजिन सुरू करण्याची समस्या. पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलचे बाष्पीभवन लवकर होत नाही. परिणामी, कडाक्याच्या थंडीत शंभर टक्के इथेनॉलवर चालणारी वाहने सुरू करणे हे एक मोठे आव्हान ठरू शकते. 'ई८५' मध्ये असलेल्या १५ टक्के पेट्रोलमुळे ही बाष्पीभवनाची प्रक्रिया सुलभ होते आणि इंजिन सहज सुरू होऊ शकते.

### ब्राझीलचे उदाहरण

ब्राझील हा जगातील सर्वात मोठा ऊस उत्पादक देश आहे. १९७० च्या दशकात जागतिक तेल संकट निर्माण झाले तेव्हापासूनच ब्राझीलने उसापासून इथेनॉल निर्मितीवर भर देण्यास सुरुवात केली होती. २००३ मध्ये 'फोक्सवॅगन' कंपनीने पहिले फ्लेक्स-फ्युएल इंजिन सादर केले, तेव्हा ब्राझीलमध्ये आधीच इथेनॉल वितरणाचे मोठे जाळे अस्तित्वात होते. यामुळे ग्राहकांना पेट्रोल किंवा १०० टक्के इथेनॉल यांपैकी कोणताही पर्याय निवडणे सहज शक्य झाले. ब्राझीलमधील यशस्वी अंमलबजावणीचे सर्वात मोठे कारण म्हणजे इंधनाचे दर. तिथे पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलचे दर नेहमीच कमी ठेवले जातात. जेव्हा पेट्रोलच्या किमती वाढतात, तेव्हा ग्राहक लगेच इथेनॉलकडे वळतात. फ्लेक्स-फ्युएल तंत्रज्ञानामुळे एकाच वाहनात कोणत्याही प्रमाणात मिश्रित इंधन वापरण्याची सुविधा मिळाल्याने ग्राहकांचे आर्थिक गणित कोलमडत नाही. ब्राझील सरकारने हे तंत्रज्ञान




यशस्वी करण्यासाठी उत्पादकांना आणि ग्राहकांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले. फ्लेक्स-फ्युएल वाहनांच्या नोंदणीवर कर सवलती दिल्या गेल्या. तसेच, प्रत्येक पेट्रोल पंपावर इथेनॉल उपलब्ध असणे अनिवार्य करण्यात आले. आज ब्राझीलमध्ये केवळ कारच नव्हे, तर दुचाकी वाहनेही मोठ्या प्रमाणावर फ्लेक्स-फ्युएलवर चालतात.

ई ८५ किंवा ई १०० सारख्या उच्च इथेनॉल मिश्रणावर चालणारी वाहने हरितगृह वायूंचे उत्सर्जन २० ते ५० टक्क्यांपर्यंत कमी करू शकतात. विद्युत वाहनांच्या मार्गात अनेक अडथळे आहेत. चार्जिंगसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांचा अभाव आणि चार्जिंगसाठी लागणारा वेळ या मोठ्या समस्या आहेत. त्यांच्या बॅटरीसाठी आवश्यक असलेल्या लिथियम आणि कोबाल्ट यांसारख्या दुर्मीळ खनिजांबाबत भारत आजही परावलंबी आहे. बॅटरी उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या शुद्धीकरणावर चीनचे जागतिक स्तरावर वर्चस्व आहे. याचा अर्थ आपण खनिजं दुसऱ्या देशातून घेतली, तरी त्यांच्या प्रक्रिया आणि पुरवठा साखळीवर एकाच देशाचे नियंत्रण आहे. ही बाब भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी भविष्यात धोकादायक ठरू शकते. याउलट इथेनॉलची निर्मिती भारतातच शेतीतून उत्पादित केली जाऊ शकते. यामुळे आपली ऊर्जा स्वायत्तता वाढण्यास मदत होईल. अर्थात संपूर्ण देशाच्या इंधन गरजेसाठी वर्षभर इथेनॉलचा सातत्यपूर्ण पुरवठा करणे कठीण आहे. दुष्काळ किंवा पिकांचे नुकसान झाल्यास पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. इथेनॉल निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर ऊस किंवा धान्याचा वापर केल्यास भविष्यात अन्न सुरक्षा धोक्यात येऊ शकते. एफएफव्ही इंजिनमध्ये वापरले जाणारे सेन्सर्स आणि सुधारित धातू यामुळे वाहनांची किंमत १५ ते २५ हजारांनी वाढू शकते. सध्या भारतात ईव्हीवर ५ टक्के जीएसटी आहे, तर फ्लेक्स-फ्युएल वाहनांवर २८ टक्के जीएसटी आहे. जोपर्यंत कर कमी होत नाही, तोपर्यंत ही वाहने महागच राहतील. तसेच पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलचे दर किती स्वस्त असतील, यावरच ग्राहकांचा प्रतिसाद अवलंबून असेल.


अभय कुलकर्णी
'इंधन' विषयाचे अभ्यासक

# मणिपूर पुन्हा का पेटलंय?

**मणिपूरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून नांदत असलेल्या शांततेला आणि शांततेच्या प्रयत्नांना पुन्हा एकदा नख लागले आहे. त्रोंगलाओबी अवांग लेकाई भागात झालेल्या बॉम्बस्फोटात दोन निष्पाप बालकांचा बळी गेला आणि या घटनेने संपूर्ण राज्याला पुन्हा एकदा आगीच्या खाईत लोटले आहे. मणिपूरला सततच्या अशांततेच्या चक्रव्यूहातून बाहेर काढण्यासाठी केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहून चालणार नाही. यासाठी मानवी दृष्टिकोनातून आणि संवेदनशीलतेने पावले उचलण्याची गरज आहे. कायम स्वरूपी शांततेसाठी सर्व घटकांशी संवाद साधणे अनिवार्य आहे.**



**मणीपूरमध्ये** शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न पुन्हा एकदा अपयशी ठरताना दिसत आहेत. फेब्रुवारीमध्ये लोकनियुक्त सरकार पुन्हा सत्तेवर आल्यानंतर जी आशा निर्माण झाली होती, ती आता मावळू लागली असून, राज्यामध्ये पुन्हा एकदा निराशेचे, असंतोषाचे आणि दहशतीचे वातावरण पसरले आहे. ईशान्येकडील या महत्त्वाच्या राज्यात गेल्या काही वर्षांत सामाजिक तणावाची जी पेरणी झाली, तिचे परिणाम आता अधिक उग्र स्वरूपात समोर येत आहेत. मैतेई, कुकी आणि नागा या प्रमुख समुदायांमधील अविश्वास आणि संघर्ष ही नवीन बाब नाही; मात्र अलीकडील घटनांनी या तणावाला आणखी धोकादायक वळण दिले आहे. सुरुवातीला मैतेई आणि कुकी समुदायांमध्ये केंद्रित असलेला संघर्ष आता नागा आणि कुकी समुदायांपर्यंत पोहोचला आहे. म्हणजेच जाणाऱ्या दिवसागणिक संघर्षाची व्याप्ती वाढत असून, राज्यातील सामाजिक संतुलन ढासळण्याच्या मार्गावर आहे.

गेल्या वर्षभरापासून मणीपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू होती. फेब्रुवारीमध्ये वाय. खेमचंद सिंग यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यावर ती संपुष्टात आली. सर्वसमावेशकतेचा संदेश देण्यासाठी कुकी-झो समुदायाच्या नेम्चा किपजेन आणि नागा पीपल्स फ्रंटच्या लोसी दिखो यांची उपमुख्यमंत्रिपदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, नव्या सरकारची स्थापना होऊन काही दिवस उलटत नाहीत, तोच वांशिक हिंसाचाराने पुन्हा डोके वर काढले आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या बॉम्बस्फोटात दोन निष्पाप मुलांचा मृत्यू झाला आणि त्यानंतर परिस्थिती अधिकच चिघळली. याच्या निषेधार्थ संचारबंदी लागू असतानाही हजारो लोक मशाल मोर्चे काढत रस्त्यावर उतरले. ठिकठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडत असून, सुरक्षा यंत्रणा या सर्वांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरत असल्याचे दिसते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा निष्प्रभ झाल्याचा हा स्पष्ट संकेत आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढणे अपरिहार्य ठरते.

मणिपूरमधील ताज्या घडामोडींमध्ये एक महत्त्वाचा बदल दिसून येत आहे, तो म्हणजे मैतेई समुदायाचा सरकारवरील विश्वास डळमळीत होऊ लागला आहे. सुरुवातीला राज्य सरकारच्या मागे ठामपणे उभा असलेला हा बहुसंख्य समुदाय आता जाहीरपणाने नाराजी व्यक्त करू लागला आहे. कायदा-सुव्यवस्थेच्या उपाययोजनांना खुलेआम आव्हान देणे, सुरक्षा दलांवर आरोप करणे आणि प्रशासनाच्या भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करणे, ही या बदलाची लक्षणे आहेत. ही स्थिती प्रशासनासाठी आव्हानात्मक ठरणारी आहे.


### असंतोष पसरण्याची भीती

मणिपूरचे भौगोलिक स्थान लक्षात घेतले तर ते म्यानमारच्या सीमेला लागून असल्याने हा प्रदेश आंतरराष्ट्रीय हालचालींसाठी संवेदनशील मानला जातो. अशा भागात अंतर्गत अस्थिरता वाढल्यास बेकायदेशीर घुसखोरी, शस्त्रास्त्रांची तस्करी आणि अतिरेकी गटांची हालचाल सुलभ होण्याची शक्यता वाढते. यामुळे केवळ स्थानिक कायदा-सुव्यवस्था नव्हे, तर देशाच्या व्यापक सुरक्षा व्यवस्थेलाही धोका निर्माण होतो. याशिवाय, ईशान्य भारतातील राज्ये परस्परांशी सांस्कृतिक, सामाजिक आणि जातीय धाग्यांनी जोडलेली आहेत. एका राज्यात निर्माण झालेला तणाव सहजपणे शेजारील राज्यांत पसरू शकतो. मणिपूरमध्ये मैतेई, कुकी आणि नागा समुदायांमध्ये निर्माण झालेला संघर्ष हा केवळ स्थानिक मर्यादेत राहील, असे मानणे अवास्तव ठरते. नागा आणि कुकी समुदायांचे अस्तित्व नागालँड, मिझोरम आणि आसामच्या काही भागांतही आहे. त्यामुळे मणिपूरमधील संघर्षाचा परिणाम या राज्यांतील सामाजिक समतोलावरही होऊ शकतो. त्यामुळे या परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे म्हणजे समस्येला अधिक खोलवर जाण्याची मुभा देणे होय.

मणिपूर हा केंद्र सरकारच्या 'ॲक्ट ईस्ट पॉलिसी'च्या दृष्टीने महत्त्वाचा दुवा मानला जातो. भारताचा आग्नेय आशियाशी व्यापार वाढवण्यासाठी या प्रदेशातील रस्ते, दळणवळण आणि सीमावर्ती व्यापारमार्ग महत्त्वाची भूमिका बजावतात. या भागात सतत तणाव आणि हिंसाचार सुरू राहिल्यास त्याचा परिणाम गुंतवणुकीवर आणि पर्यायाने विकासावर होतो. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांनी या परिस्थितीकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या समस्येच्या चौकटीत पाहणे पुरेसे ठरणार नाही. सर्वात आधी शस्त्रसंधी आणि शस्त्रास्त्रांची वसुली होणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांच्या हातात शस्त्रे आहेत, तोपर्यंत शांतता अशक्य आहे. दुसरे म्हणजे, सर्व समुदायांचा विश्वास संपादन करू शकेल अशी एक निष्पक्ष 'शांतता समिती' स्थापन करणे गरजेचे आहे. यामध्ये राजकीय नेत्यांऐवजी नागरी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती आणि महिला नेत्यांचा सहभाग असायला हवा. तसेच डोंगराळ भागातील आदिवासींचे हक्क अबाधित राखतील आणि खोऱ्यातील जनतेची कोंडीही फोडतील, असे बदल जमिनीच्या कायद्यांमध्ये करणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र सरकारने केवळ प्रेक्षकाची भूमिका न घेता निर्णायक हस्तक्षेप करणे काळाची गरज आहे.


विकास मेश्राम

# नवाकाळ शब्दकोडे–१५८७



## आडवे शब्द –

१. पुरेसा नसलेला, आखूड ३. किरकोळ दुरुस्ती ६. बालपणी श्रीकृष्णाने सर्वांच्या मदतीने उचललेला डोंगर १२. धूम्रपानाचे नळकांडे १३. उणे १५. जरचा जोडीदार १६. संगोपन करणारा १७. दिशादर्शक साधन १८. डोळ्यांना सुखवणारे २२. उत्तराधिकारी २४. विभाग, दालन २६. सेवक, चाकर २७. घनदाट, निबीड २८. थकलेला २९. समर्थन, बळकटी ३०. चामखीळ ३२. वृक्ष ३३. मनाचा मोठेपणा ३५. '××× जाऊन भांडे लपवणे!' ३७. ओशाळलेला ३९. जवळीक ४०. पृथ्वी ४१. किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी असलेला ४२. भाजी धुण्याचे भांडे ४३. गणपती ४७. नेहमी ४८. तळतळाट ५०. कांकू करणे, विरोध, आक्षेप ५२. माफी ५३. समुद्राच्या पोटातील अग्नी ५५. रद्द ५६. इच्छा, कामना ५७. नवी पालवी, तारुण्याचा बहर ५९. काळजीत पडलेला ६१. ज्ञाती ६२. वस्त्रावर पडलेले छिद्र बुजवण्याचे काम ६८. सारखेपणा ७०. 'जगी सर्व सुखी असा कोण आहे....' संत रामदास ७३. सातू ७४. भिंतीला पडलेले भगदाड ७५. लाट ७६. आच, उष्णता ७७. चिक्कार ७९. जनता ८०. चौदा ओळींचा काव्यप्रकार ८२. नवीन ८४. अर्धवट शिजलेले ८५. पत्ता ८८. सवडीनुसार ८९. गार ९१. बनारसमधून वाहणारी नदी ९२. मनस्वी, स्वच्छंद ९३. मोत्याला पाडलेले छिद्र ९३अ. अणकुचीदार ९५. प्रवासी ९८. बिकट, क्लिष्ट ९९. धनुष्य १००. अंत १०१. पारंगत, निष्णात

## उभे शब्द –

२. पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून राजा दशरथाने हा यज्ञ केला होता ३. फळांची टोपली ४. जाणे ५. व्हिटामिनसाठी मराठी शब्द ७. डुक्कर ८. नम्र वाकलेला ९. उद्यानंतरचा दिवस १०. शोध ११. 'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ....' संत रामदास १२. एक औषधी वनस्पती १४. घट्ट १९. जेव्हा २०. कागदी चलन २१. खूप, पुष्कळ २३. पाठवणी २५. कुवत २९. रोमांचित ३१. होकारार्थी ३२. चुण्या-चुण्यांची शिवण असलेली पट्टी ३३. कक्ष, हॉल ३४. दुःखी, नाराज ३६. सुंदर स्त्री ३८. प्राणदान ४४. अवस्था ४५. वळसे ४६. सारखा ४७. प्रश्न ४९. पुन्हा ५०. ऊन ५१. चरफड, अव्यक्त राग ५४. रोगप्रतिबंधक औषध, फोडातील द्राव ५६. शस्त्राचा घाव ५८. वर्जित केलेले ६०. काळजीत पडलेला ६३. निरंतर, सतत ६४. विचारांना चालना देणारे ६५. स्वच्छ, निर्मळ ६६. न शोभणारे, असभ्य ६७. जनरेटर ६९. उन्मत्तपणा ७०. तांबूल ७१. अकारण ७२. पुष्परस गोळा करणारी माशी ७४. दोन पर्वतांमधली चिंचोळी वाट ७८. अमाप धनसंपत्ती ८१. खात्री वा सहमती नसताना एखाद्याच्या विधानाबाबत वापरला जाणारा शब्द ८२. असंमती, नाकारणे ८३.ताब्यात आलेला, अधीन झालेला ८४. एक लोकप्रिय उसळ, डाळिंबी ८६. सोपे ८७. पावलांचा आवाज, चाहूल ९०. सरोवर ९३. मतिभ्रम, खूळ ९३अ. टक्कल झाकणारा केशकलाप ९४. बटीक ९६. हात ९७. ब्राह्मण अथवा पक्षी •

### नवाकाळ कोडे क्रमांक १५८६ चे उत्तर

**आडवे शब्द :** ३. वृक्षारोपण ८. वाळवी १०. विपरीत बुद्धी १२. गत १३. पुत्र मानवाचा १६. चाड १७. रज १८. पटकन १९. तारा २०. ढोंग २२. गारूड २४. मागोमाग २५. प्रभावळ २७. पथकर ३०. निगा ३३. सूतपुत्र ३६. भरती ३७. मयसभा ४०. खंड ४१. राकट ४३. दंडकारण्य ४५. मतलबी ४७. बाणा ४८. रगड ४९. कर्ण ५०. गज ५१. वरमाई ५३. साफ ५४. कस ५६. वैश्य ५७. उडी ५८. अंक ५९. सवलत ६१. रवा ६३. पूल ६६. रजनी ६८. भार ६९. दलबदलू ७०. यातायात ७४. रान ७५. भुई ७६. चर ७७. नड ७८. विनीत ८०. उतराई ८२. भेजा ८३. वय ८४. पोप ८५. थाप ८७. रत ८८. विष ९०. मिठाई ९२. दावा ९४. रिक्त ९५. वात ९७. जहाल ९९. शिलाई १०१. सराव १०३. लय १०४. आरवसा १०७. श्वशुर १०९. कस्पट ११०. लागट १११. मारक ११२. सनसनाटी ११३. जलद

**उभे शब्द :** १. झापड २. पितर ३. वृद्धी ४. रोगट ५. पतकर ६. पात्रता ७. म्यान ८. वाचा ९. वीरांगना १०. विचारविनिमय ११. बुजगावणे १४. मारामार १५. वाममार्ग १८. पड २१. विप्र २२अ. रूळ २३. ग्रंथ २६. सुत २७. पत्रक २८. कळी २९. हिरण्यकश्यपू ३१. गाय ३३. सूड ३४. पुराणा ३५. बंड ३६. भर ३८. समज ३९. भात ४०. खंबीर ४२. टरफल ४३. दंडक ४४. काथ्या ४६. लवकर ४७. बाई ५०. गडी ५२. मानिनी ५३. सावरणे ५५. सरबराई ५७. उदयाचली मित्र आला ५९. सभा ६०. तदनंतर ६२. वादन ६४. लढाई ६५. वाया ६७. जस्त ७१. तार ७२. तनय ७३. धनी ७५. भुजा ७८. विपदा ७९. तथा ८१. रातवा ८२. भेषज ८३. वई ८६. परिवर्तन ८९. खल ९१. भला ९३. वासर ९६. तलफ ९८. हास्यास्पद ९९. शिसा १००. ईश्वर १०२. रचना १०५. रग १०६. वट १०८. शुक १०९. कल




# राशिभविष्य

**रविवार २६/०४/२०२६ ते शनिवार ०२/०५/२०२६**

## मेष

**आठवड्याचा** मध्य महत्त्वाच्या कामांसाठी, स्पर्धेमध्ये पुढे जाण्यासाठी चांगला ठरणार आहे. बंधने, अडथळे असले तरी इच्छाशक्तीच्या जोरावर ठरवलेल्या गोष्टी पूर्ण करा. आत्मविश्वास चांगला राहील. नैराश्य व धडाडी, उत्साह असे टोकाचे भाव येऊ शकतात. सकारात्मक मानसिकता ठेवावी. आर्थिक स्थिती चांगली राहील. मात्र मोठी गुंतवणूक टाळावी.

कुटुंबामध्ये संमिश्र वातावरण राहील. उत्साहाच्या भरात मने दुखावतील असे बोलणे टाळावे. तुमचा अहंकार नात्यांमध्ये दुरावा आणू शकतो. संततीशी जवळीक साधण्यासाठी सुसंवाद ठेवा. जोडीदाराच्या मताचा आदर करावा. घरातील ज्येष्ठांची, आईची काळजी घ्या. भावंडांचे सहकार्य मिळेल.

उद्योग-व्यवसायात अनुभवी व्यक्तींचा सल्ला घेतला तरी अंतिम निर्णय स्वतःच घ्या. व्यावसायिक भांडवल उभे करताना सावधगिरी बाळगावी. कायदेशीर सल्ला जरूर घ्यावा. तुमचे अभ्यासपूर्ण नियोजन अत्यंत उपयुक्त ठरेल. प्रवासातून फायदा होईल. नवीन संधीचा जरूर लाभ घ्यावा. नोकरदारांना स्वतःची क्षमता सिद्ध करता येईल. कष्टाचे चीज होईल.

**शुभ दिनांक :** २८, २९, ३०.

## वृषभ

सुरुवातीला अडथळे, अडचणी आल्या तरी आठवड्याची अखेर तुमच्यासाठी यश देऊन जाईल. तुमच्या प्रयत्नांना भाग्य साथ देईल. द्विधा मनस्थिती असली तरी ठामपणे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी. चैनीकडे थोडा कल राहील. प्रत्यक्ष कृतीला प्राधान्य द्यावे. सध्याचे ग्रहमान तुमच्या प्रगतीचे संकेत देत आहे. आत्मविश्वास महत्त्वाचा ठरेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. मोठी गुंतवणूक मात्र सध्या पुढे ढकला.

घरामध्ये नाती जपण्यासाठी वेळप्रसंगी माघार घ्यावी. अहंकार त्रासदायक ठरेल. वडिलोपार्जित संपत्तीसंबंधित प्रश्न मार्गी लागतील. परंतु बोलण्यामुळे वादविवाद होणार नाही याची काळजी घ्यावी. जोडीदार व संततीशी मतभेद टाळण्यासाठी सुसंवाद ठेवावा. आईच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये जुनी येणी वसूल करू शकाल. नोकरदारांनी बंडखोरीची भूमिका न घेता मवाळ धोरण ठेवावे. व्यावसायिकांना अचानक व अनपेक्षित घडणाऱ्या घडामोडींसाठी तयारीत राहावे लागेल. तुमचे धोरण, योजना गुप्त ठेवा.

**शुभ दिनांक :** ३०, १.

## मिथुन

**आठवडा** धावपळीचा ठरेल. अनेक ठिकाणी लक्ष द्यावे लागणार आहे. कामाचे नियोजन करणे आवश्यक आहे. संयमित धडाडी, सातत्य उपयोगी पडेल. प्रवासामुळे फायदा होईल. आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल. योग्य सावधगिरी बाळगून आर्थिक गुंतवणूक करू शकाल. प्रत्येक ठिकाणी बंधन पाळणे आवश्यक आहे. कामाचा वेग वाढवावा लागेल. योग्य वेळी योग्य कृतीचे भान ठेवावे लागेल.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. चैनीकडे कल राहिल्यामुळे खर्चिक वृत्ती वाढेल. कौटुंबिक जबाबदारी पार पाडताना राग व नैराश्य यावर नियंत्रण ठेवावे. मातेच्या आरोग्याकडे लक्ष द्या. जोडीदाराची साथ असली तरी त्याला मर्यादा असतील. संततीशी मतभेद होणार नाही याकडे लक्ष द्या. संततीसाठी जास्तीच्या खर्चाची तयारी ठेवा.

कार्यक्षेत्रामध्ये आजूबाजूच्या परिस्थितीचा अंदाज घेऊन धोरणात्मक बदल केल्यास उद्दिष्टपूर्ती होईल. विरोधकांचे डावपेच ओळखून कार्यशैली बदलावी लागेल. नोकरदारांनी आक्रमकता टाळून वरिष्ठांशी जमवून घ्यावे. कामाच्या स्वरूपात बदल होऊ शकतो. व्यावसायिकांना भागीदारीमध्ये यश मिळेल. नवीन ओळखी होतील. नवीन संधीतून लाभ होईल. परिश्रमाला भाग्याची साथ आहे.

**शुभ दिनांक :** २६, २७.

## कर्क

आठवड्याचा मध्य अनेक घडामोडींचा राहील. निर्णय घेताना भावना व व्यावहारिकता यामध्ये समतोल राखा. मनाची एकाग्रता आवश्यक आहे. योग्य वेळी योग्य कृती यश मिळवून देणार आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. जुनी येणी वसूल करता येतील. सामाजिक प्रतिष्ठा जपा.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. तुम्हाला अलिप्तपणे वागावे लागेल. भावनेच्या आहारी जाऊन निर्णय घेऊ नका. मित्रपरिवार वाढेल. भावंडांचे सौख्य टिकवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. त्यांना मदत करावी लागेल. संतती व जोडीदार यांच्याशी मतभेद झाले तरी त्यांची प्रगती समाधान देणार आहे. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घ्यावी.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. त्यामुळे तुमच्या अधिकारात वाढ होईल. नियमाप्रमाणेच काम करा. कामाचे स्वरूप बदलेल व त्यामुळे कार्यपद्धती बदलावी लागेल. हा बदल उपयुक्त ठरेल. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. प्रवासामुळे फायदा होत असला तरीही प्रवासात काळजी घ्या. नवीन करार करताना कायदेशीर बाबी तज्ज्ञांकडून तपासाव्या.

**शुभ दिनांक :** २८, २९, ३०.

## सिंह

**संमिश्र** ग्रहमान असलेला हा आठवडा आहे. तुमचा राशीस्वामी रवि उच्च होऊन भाग्यस्थानी आहे, ही मोठी सकारात्मक बाब आहे. जबाबदारी व अधिकार वाढणार आहेत. योग्य नियोजन व मनाची एकाग्रता तुम्हाला यश मिळवून देईल. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. संचित धन सांभाळण्यासाठी अनावश्यक खर्चाला कात्री लावा.

कौटुंबिक आघाडी सांभाळताना कसरत होणार आहे. कुटुंबातील मतभेद प्रयत्नपूर्वक मिटवा. त्यासाठी सुसंवाद ठेवा व घरातील ज्येष्ठांची मदत घ्या. मुलांच्या दृष्टीने चांगल्या घटना घडल्यामुळे तुमचा उत्साह वाढेल. जोडीदाराची काळजी घ्या. गैरसमज होणार नाहीत याकडे लक्ष द्यावे. भावंडांचे सौख्य लाभेल. मित्रपरिवारावर अवलंबून राहू नये.

कार्यक्षेत्रामध्ये विरोधक कार्यरत होणार आहेत. अत्यंत संयमाने त्याला तोंड द्यावे. तुमची स्थिती मजबूत आहे. नियोजित कामांसाठी योग्य धोरण आखावे. नोकरदारांना नियमाप्रमाणेच व मनाविरुद्ध काम करावे लागेल. व्यावसायिकांना नवीन संधीचा लाभ घेणे फायदेशीर ठरेल. मोठे निर्णय घेताना अनुभवी व्यक्तीचा सल्ला जरूर घ्या.

**शुभ दिनांक :** २६, २७, १.

## कन्या

**आठवड्याचा** मध्य तुमच्यासाठी चांगला राहील. मानसिक समतोल राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नैराश्य व आक्रमकता यावर नियंत्रण ठेवा. घाईगडबडीत निर्णय घेणे टाळावे. तुमचा भाग्याचा कारक शुक्र स्वगृही असल्यामुळे तुमच्या श्रमाला प्रयत्नांना यश नक्की मिळेल. कामाची गती वाढवावी. योग्य वेळी कृती होणे महत्त्वाचे आहे. नियमांविरुद्ध जाऊ नका. तुमचा आत्मविश्वास कायम राखा.

घरामध्ये अनेक आघाड्या सांभाळाव्या लागतील. मतभेद, वादविवाद टाळण्यासाठी प्रयत्न करा. जोडीदार कामामध्ये व्यस्त राहील. मुलांचे हट्ट पूर्ण करावे लागतील. मित्रपरिवार, भावंडे यांच्याशी दुरावा जाणवेल.

कार्यक्षेत्रामध्ये बदलत्या परिस्थितीला, स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. हितशत्रू व स्पर्धकांचे डावपेच ओळखून जशास तसे उत्तर द्यावे. तुमच्या योजना गुप्त राखा. नोकरदारांना स्वतःच्या क्षमतेवर, कौशल्यावर कामे पार पाडावी लागतील. वरिष्ठांची साथ गृहीत धरू नका. व्यावसायिकांनी भागीदाराशी पारदर्शक व्यवहार ठेवावेत.

आरोग्याची काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** २८, २९, ३०.

## तूळ

**आठवड्याची** सुरुवात व अखेर चांगली होईल. काही बंधने पाळल्यास एकंदरीत हा आठवडा कष्टाने पण उद्दिष्टपूर्ती करणारा आहे. राशीस्वामी शुक्र स्वराशीचा आहे. त्यामुळे अडथळे आले तरी ते पार करण्याची क्षमता तुमच्यामध्ये असेल. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल. आर्थिक स्थिती सर्वसाधारण आहे. आर्थिक गुंतवणूक अनुभवी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन दीर्घ मुदतीसाठी करावी. त्यातून फायदा होईल.

कौटुंबिक आघाडी सांभाळताना संयमाची पराकष्ट करावी लागेल. छोट्या मोठ्या समस्या चतुराईने सोडवता येतील. गृहसजावटीच्या वस्तू खरेदीचे योग आहेत. मुले व जोडीदाराचे हट्ट पुरवावे लागतील. अनावश्यक खर्च मात्र टाळावेत. सहलीचे आयोजन होईल. कार्यक्षेत्रामध्ये तुमच्या प्रगतीच्या दृष्टीने सकारात्मक घडामोडी घडतील. मिळालेली संधी घालवू नका. विरोधकांच्या कारवाया दुर्लक्षित करू नयेत. अचानक येणाऱ्या परिस्थितीसाठी तयारी ठेवा. तुमचे धोरण लवचिक ठेवा. तुमच्या योजना गोपनीय ठेवा. तात्पुरता फायदा बघण्यापेक्षा भविष्यातील फायद्याचाही विचार करावा.

**शुभ दिनांक :** २६, २७, १.

## वृश्चिक

**अडचणी** असल्या तरीही एकंदरीत हा आठवडा चांगला जाईल. नियमांचे, कायद्याचे काटेकोरपणे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. आर्थिक कोंडी होऊ शकते. त्यामुळे आर्थिक नियोजन योग्य तऱ्हेने करावे. संचित धन सांभाळा. काही गोष्टी मनाविरुद्ध कराव्या लागतील. कामामध्ये सातत्य व संयम महत्त्वाचा ठरेल. मनाची अस्वस्थता नियंत्रणात ठेवा. सकारात्मक विचार निर्णय घेण्यास मदत करतील.

कौटुंबिक संपत्तीचे प्रश्न मार्गी लावू शकाल. जोडीदाराच्या मताचा आदर करावा. संततीचे प्रश्न शांतपणाने हाताळावे. त्यांच्या मागण्या पूर्ण कराल. मित्रमंडळींवर अवलंबून राहू नका. घरातील ज्येष्ठांचा सल्ला उपयोगी पडेल.

कार्यक्षेत्रामध्ये नव्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी आर्थिक तजवीज करताना तारांबळ उडेल. परंतु काम अडणार नाही. सरकारी, स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळू शकेल. व्यावसायिकांनी नवीन कार्यक्षेत्रात काम करण्याचे नियोजन सुरू करावे. नोकरदारांना नोकरीत, कामाच्या पद्धतीत अपेक्षित बदल करता येईल. स्पर्धेमध्ये तुमचे वर्चस्व दिसून येईल.

**शुभ दिनांक :** २६, २८, २९, ३०.

## धनु रास

**या** आठवड्याच्या उत्तरार्धात मनासारख्या घटना घडणार आहेत. तुमच्या परिश्रमाचे चीज होणार आहे. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. खर्चावर नियंत्रण ठेवा. नवीन प्रकल्प सुरू करण्याचे योजाल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. मनस्वास्थ चांगले राहण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. उत्साहाने कार्यरत राहा. वास्तुविषयक कामांमध्ये यश मिळेल.

कुटुंबामध्ये आनंदी वातावरण राहील. किरकोळ वादाकडे दुर्लक्ष करणे हितावह राहील. संततीच्या बाबत सुवार्ता समजतील. वैवाहिक जीवनात गोडवा टिकवून ठेवा. भावंडांना मदत करावी लागेल. मित्रमंडळीच्या गाठीभेटी होतील. छोट्या सहलीचा आनंद घ्याल.

कार्यक्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होतील. व्यवसायवृद्धीसाठी अधिक प्रयत्नशील राहाल. भागीदारी व्यवसायात जोडीदाराची साथ लाभेल. कामाचा ताण जाणवेल. नोकरीत स्वतःचे कौशल्य सिद्ध कराल. वरिष्ठ मदत करू शकणार नाहीत. नवीन गोष्टी शिकण्याकडे कल राहील.

शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** २८, २९, ३०.

## मकर

**या** आठवड्याच्या शेवटी तुम्ही योजलेल्या कामांमध्ये सफलता मिळवू शकाल. सुरुवातीला अडथळे निर्माण होतील. नवनवीन कल्पना सुचतील. अती धाडस त्रासदायक ठरेल. विचारपूर्वक कृती करावी. अपेक्षित धनलाभ झाला तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्याने, सावधगिरी बाळगून गुंतवणूक करण्यास योग्य काळ आहे.

घरात सुखसोयी उपलब्ध कराल. धार्मिक स्थळांना कुटुंबासहित भेट देण्याचा योग आहे. वडिलोपार्जित मालमत्तेसंबंधी कामे मार्गी लागतील. भावंडाशी गैरसमज टाळा. कुटुंबामध्ये आनंदी वातावरण राहील. जोडीदाराशी सलोखा राहील. संततीची शैक्षणिक प्रगती चांगली होईल. किरकोळ वाद होऊ शकतात.

नोकरदार वर्गाला वरिष्ठांची मर्जी राखण्यात यश मिळेल. नोकरीच्या शोधात असलेल्यांना संधी मिळेल. कामानिमित्त अधिक प्रवास करावा लागेल. व्यावसायिक गुंतवणूक करताना जाणकार मंडळींचा सल्ला घेणे आवश्यक. कागदपत्रे पडताळून पाहावीत. व्यावसायिक कामासाठीचा प्रवास फायदेशीर ठरेल.

**शुभ दिनांक :** ३०, १.

## कुंभ

**सुरुवात** चांगली असली तरी हा आठवडा अधिक धावपळीचा राहणार आहे. नवनवीन संकल्पना राबवण्यासाठी अधिक प्रयत्नशील राहाल. कोणतेही निर्णय घाईगडबड न करता घ्यावेत. आर्थिक व्यवहार लांबणीवर पडण्याची शक्यता राहील. पैश्याबाबत गोपनीयता बाळगावी. कामानिमित्त प्रवास घडेल. वस्तू गहाळ होणार नाही याची काळजी घ्यावी. सामाजिक कार्यात सहभागी होता येईल.

वडिलोपार्जित मालमत्तेसंबंधित कामे मार्गी लावण्यासाठी कुटुंबातील सदस्यांशी, मुलांशी सुसंवाद साधला पाहिजे. मुलांचा, जोडीदाराचा उत्कर्ष आनंद देईल. मित्रपरिवार साथ देईल. घरामध्ये आनंदी वातावरण राहील. छोटा समारंभ आयोजित करता येईल.

उद्योगव्यवसायात भागीदाराची साथ चांगली राहील. नोकरीमध्ये अचानक काही जबाबदारी स्वीकारावी लागेल. हाताखालच्या माणसांशी पटवून घ्यावे लागेल. जुनी येणी मिळवताना तारांबळ उडेल. आरोग्यासाठी खाण्याची पथ्ये सांभाळावीत.

**शुभ दिनांक :** २६, २७.

## मीन

**आठवड्याच्या** सुरुवातीला काही गोष्टी मनासारख्या घडल्या नाहीत तरी संयम ठेवणे आवश्यक राहील. महत्त्वाची कामे पूर्वार्धात करून घ्या. स्थिर मनाने निर्णय घेऊन शत्रूला नामोहरम करता येईल. तुमच्या योजना सफल होणार आहेत. आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होईल. मात्र व्यवहार करताना खबरदारी घेणे गरजेचे आहे. भावनिक निर्णय टाळावे. कामानिमित्त दूरचा प्रवास करावा लागेल. स्पर्धा परीक्षांसाठी योग्य काळ आहे.

कौटुंबिक नात्यात तुमच्या बोलण्याचा मान राखला जाईल. घरात एखाद्या कार्यक्रमाचे नियोजन होईल. ज्येष्ठ मंडळींशी वाद होणार नाही याची काळजी घ्यावी. संततीबाबतच्या चिंता दूर होतील. जोडीदाराचे सहकार्य चांगले राहील. कौटुंबिक व्यवसाय यशस्वी होतील. मौजमजा करताना अनावश्यक खर्च होऊ शकतो. नोकरीसाठी प्रयत्न करणाऱ्यांना नोकरीच्या संधी मिळतील. नोकरदारांना बढतीचे योग आहेत. भागीदारी व्यवसायात जोडीदाराची मदत चांगली लाभेल. परंतु पारदर्शक व्यवहार ठेवा.

आरोग्याच्या किरकोळ समस्या जाणवतील.

**शुभ दिनांक :** २६, २८, २९, ३०.

– ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे



# वैष्णोदेवी मंदिरात अर्पण केलेली ९५ टक्के चांदी बनावट

**जम्मू -** जम्मू आणि काश्मीरमधील वैष्णोदेवी मंदिर येथे अर्पण करण्यात आलेल्या चांदीपैकी तब्बल ९५ टक्क्यांहून अधिक दागिने बनावट आहेत. भाविकांकडून चांदी म्हणून अर्पण करण्यात आलेल्या दागिन्यांमध्ये प्रत्यक्षात इतर धातूंचा वापर करण्यात आल्याचे तपासणीत आढळले आहे. मंदिर प्रशासनाने सुमारे २० टन चांदीचे दागिने वितळवून साठवण्यासाठी सरकारी टांकसाळीकडे पाठवले होते. मंदिर प्रशासनाला सध्याच्या बाजारभावानुसार सुमारे ५०० ते ५५० कोटी रुपयांच्या चांदीची अपेक्षा होती. पण तपासणीनंतर टांकसाळीने दिलेल्या अहवालात केवळ ५ ते ६ टक्केच दागिने शुद्ध चांदीचे असल्याचे स्पष्ट झाले. उर्वरित दागिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कॅडमियम आणि लोखंड आढळले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# घरकामगार हा एक 'कर्मचारी'च तो त्या कुटुंबाचा 'वारस' होत नाही

■ मुंबई

**रक्ताचे** किंवा कायदेशीररित्या मान्यताप्राप्त नाते नसताना केवळ प्रेमापोटी किंवा काळजीपोटी घरमालकाशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवून असलेला घरकामगार हा एक कर्मचारीच असतो. तो त्या कुटुंबाचा सदस्य होत नाही. कायद्याच्या नजरेत तो वारस ठरू शकत नाही, असा निर्वाळा देत मुंबई उच्च न्यायालयाने एका घरकामगाराला दिलेला भाड्याचा फ्लॅट खाली करण्याचे निर्देश दिले आहेत.

## उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

दक्षिण मुंबईतील गावदेवी येथील शंकर भवन इमारतीमधील एका फ्लॅटचा वाद होता. पी.एस. आठवणकर हे एका फ्लॅटचे मालक असून, त्यांच्याकडे शांताराम गुजर हे १९४८ पासून घरकामगार म्हणून राहत होते. ते त्यांच्याच फ्लॅटमध्येच भाड्याने राहत होते. परंतु १९८५ मध्ये फ्लॅटचे मूळमालक आठवणकर यांचे निधन झाल्यानंतर गुजर यांनी त्या फ्लॅटवर भाडेकरू म्हणून आपला हक्क सांगितला होता. त्यांच्या या प्रकरणाच्या सुनावणीवर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि आरती साठे यांच्या खंडपीठाने निकाल देताना घरकामगार गुजर याचा मालकीहक्क दावा फेटाळून लावला. महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्यानुसार, कुटुंब या व्याख्येत केवळ रक्ताची नाती किंवा कायदेशीर विवाहातून निर्माण झालेली नातीच येतात.

# भारताची मालदीवला ३ हजार कोटींची मदत

■ माले

**पुन्हा** एकदा भारत आपल्या मित्र राष्ट्राच्या मदतीला धावून आला आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या मालदीवला भारताने ३ हजार कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. मालदीवमधील भारतीय उच्चायुक्तालयाने याबाबत माहिती दिली. भारताने मालदीवला दिल्या जाणाऱ्या आर्थिक आणि वित्तीय मदतीचा भाग म्हणून ३० अब्ज म्हणजे ३ हजार कोटी रुपयांचा पहिला हप्ता देण्यास मंजुरी दिली आहे. माले येथील भारतीय उच्चायुक्तालयाने एक निवेदन जारी केले आहे. भारताने मालदीवला ही मदत सार्क चलन अदलाबदल (करन्सी स्वॅप) चौकटीअंतर्गत केली आहे. ३ हजार कोटी रुपये पहिला हप्ता म्हणून दिला जाणार आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांच्या नवी दिल्ली दौऱ्यादरम्यान भारतीय रिझर्व्ह बँक आणि मालदीव सरकार यांच्यात बैठक झाली होती. त्यावेळी मालदीवला भारताने ४०० दशलक्ष डॉलर्सची मदत दिली होती.

# इराण-अमेरिका चर्चेचा घोळ सुरूच दोन्ही पक्षांच्या परस्परविरोधी भूमिका

■ इस्लामाबाद

**इराण** आणि अमेरिकेदरम्यान युद्धविरामाच्या चर्चेची दुसरी फेरी आज इस्लामाबादमध्ये आयोजित करण्यात आली होती. मात्र शांतता चर्चेबाबत दोन्ही देश परस्पर विरोधी भूमिकांवर आजही ठाम राहिले. अमेरिकेला इराणसोबत थेट चर्चा करायची होती. तर इराणला ते मंजूर नव्हते. आपल्या अटी पाकिस्तानसमोर ठेवणार, पाकिस्तानने मध्यस्थ म्हणून त्या अटींबाबत अमेरिकेशी चर्चा करावी, अशी भूमिका इराणने घेतली. त्यामुळे या दुसऱ्या फेरीतील चर्चेचे नेमके काय झाले हे कळू शकले नाही.

चर्चेसाठी इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची एक दिवस आधीच म्हणजेच शुक्रवारी रात्री इस्लामाबादमध्ये दाखल झाले होते. तर अमेरिकेकडून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि ट्रम्प यांचे जावई जेरेज कुशनर शनिवारी पाकिस्तानमध्ये दाखल होणार होते.

अमेरिकेचे उप राष्ट्राध्यक्ष जे डी व्हान्स या दुसऱ्या फेरीतील चर्चेमध्ये सहभाग घेणार नाहीत, असे सांगण्यात आले. आवश्यकता भासली तरच त्यांना पाठवायचे, अशी ट्रम्प यांची योजना होती. दुसरीकडे ११ आणि १२ एप्रिल असे दोन दिवस इस्लामाबादमध्ये झालेल्या पहिल्या फेरीतील चर्चेत इराणच्या प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व करणारे इराण संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेर गालिबाफ दुसऱ्या फेरीतील चर्चेत सहभागी होणार नाहीत, असे सांगण्यात आले.

# तेलंगणात के. कविता यांनी नवा पक्ष स्थापन केला

■ हैदराबाद

**तेलंगणाचे** माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या के. कविता यांनी तेलंगणा राष्ट्र सेना नावाने स्वतंत्र पक्ष स्थापन केला आहे. काल त्यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली. सुमारे ७ महिन्यांपूर्वी के. कविता यांनी भारत राष्ट्र समिती या पक्षाचा राजीनामा दिला होता.

नव्या पक्षाची घोषणा करण्यापूर्वी के. कविता यांनी हैदराबादच्या गुन पार्क येथील १९६९ च्या स्वतंत्र तेलंगणा राज्याच्या मागणीसाठी झालेल्या आंदोलनात प्राणांची आहुती देणाऱ्या आंदोलकांचे स्मारक असलेल्या अमरावीरुला स्तुपम येथे पुष्पांजली अर्पण केली. तेलंगणावासियांनी पाहिलेले स्वप्न आणि प्रदीर्घ काळ पूर्ण न झालेल्या मागण्या यावर आपल्या पक्षाचा मुख्य भर राहील, असे पक्षाची घोषणा करताना के. कविता यांनी सांगितले. पक्षस्थापनेची घोषणा केल्यानंतर के. कविता यांनी एक्स पोस्ट करत विरोधकांना इशारा दिला. या पोस्टमध्ये के. कविता यांनी म्हटले की, तेलंगणा राष्ट्र सेना हे नाव लक्षात ठेवा. काहीही झाले तर आम्ही माघार घेणार नाही. तेलंगणावासियांना आता आपले मत मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.



# शिंदे-बावनकुळे यांच्यात भूखंडावरून संघर्षाची ठिणगी

■ मुंबई

**एमएमआरडीएला** दिलेल्या एका ३३ हजार ९५४.६१ हेक्टर भूखंडाच्या मालकीवरून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात संघर्षाची ठिणगी पडली आहे.

महसूल विभागाच्या अखत्यारितील जमीन मंत्रिमंडळाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे वाद पेटला आहे. या निर्णयामुळे ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांतील मोक्याच्या जमिनींवरील महसूल विभागाचे नियंत्रण संपुष्टात आले आहे. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री बावनकुळे यांनी आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत, ज्या सरकारी भूखंडांचा विकास अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे किंवा ज्या जमिनींच्या वाटपातील अटींचा भंग झाला आहे, अशा जमिनी पुन्हा ताब्यात घेण्याच्या हालचाली महसूल विभागाने सुरू केल्या आहेत. यात 'सिडको' आणि 'नैना' आदी संस्थांना दिलेल्या जमिनींची माहिती मागवण्यात आली आहे.

विशेष म्हणजे या दोन्ही संस्था नगरविकास विभागांतर्गत येतात. या विभागाचे नेतृत्व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत आहेत. महसूल विभागाने कोकण विभागीय आयुक्तांना या जमिनींच्या वाटपाची सविस्तर माहिती जमा करण्याचे आदेश दिले आहेत. यात किती भूखंड कोणाला दिले आणि तेथे कायदेशीर अटींचे पालन झाले आहे का, याची तपासणी केली जाणार आहे.

# धावत्या लोकलवर लोखंडी रॉड आदळला! २ प्रवासी जखमी

■ मुंबई

**कल्याण-कसारा** मार्गावर खर्डीहून कसाऱ्याकडे जाणाऱ्या धावत्या लोकलवर ब्लास्टिंगचा ढिगारा व लोखंडी रॉड कोसळल्याने दोन प्रवासी जखमी झाले आहेत. त्यातील एकाची प्रकृती गंभीर असून, त्याला ठाण्यातील खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. खर्डी-उंबरमाळी रेल्वे मार्गादरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी तीन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

या अपघातातील जखमींची नावे एकनाथ ठोंबरे आणि रोहित सरकुटे अशी आहेत. कोणत्याही प्रकारचा ब्लॉक न घेता हे काम केल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कल्याण-कसारा रेल्वे मार्गावर सध्या तिसऱ्या व चौथ्या लाईनचे काम सुरू आहे. त्यासाठी अनेक ठिकाणी ब्लास्टिंग करण्यात येते. मंगळवारी

## तीन कर्मचारी निलंबित

वेगाने लोकल जात असताना मोठा रॉड कसाऱ्याकडे उडून तो थेट एका डब्यावर आदळला. यात दरवाजाजवळ उभे असलेले रोहित सरकुटे व एकनाथ ठोंबरे हे दोघेही जखमी झाले. हा फटका एवढा जबरदस्त होता की, ठोंबरे हे तर थेट खाली कोसळले.

# शिक्षण मंडळ कर्मचाऱ्यांचे आंदोलन १०वी-१२वीचा निकाल लांबणीवर?

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांच्या बढती आणि बदलीच्या नियमांमध्ये बदल करण्यात आला आहे. याला विरोध करत मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी २८ एप्रिलपासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यामुळे राज्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे निकाल लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे लाखो विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

यापूर्वी दोन वर्षांनंतर बदलीची प्रक्रिया होती. मात्र



आता ती मुदत चार ते सहा वर्षांपर्यंत वाढवल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला. हा निर्णय राज्य शिक्षण कर्मचारी संघटनेला विश्वासात न घेता एकतर्फी घेतल्याचा दावा करण्यात येत आहे. या निर्णयाविरोधात कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, २८ एप्रिलपासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा दिला. आंदोलन सुरू झाले, तर दहावी आणि बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणी, गुण नोंदणी, निकाल अंतिम करणे आणि निकाल जाहीर करण्याची प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो.

# आज मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावर मेगाब्लॉक घोषित

■ मुंबई

**मध्य** रेल्वेने विविध अभियांत्रिकी व देखभाल कामासाठी उद्या रविवार २५ एप्रिल रोजी हार्बर मार्गावर मेगाब्लॉक घोषित केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते चुनाभट्टी/वांद्रे यादरम्यान अप व डाऊन मार्गांवर सकाळी ११.४० ते सायंकाळी ४.४० या वेळेत म्हणजे पाच तास मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.

या ब्लॉकदरम्यान सीएसएमटीहून वाशी, बेलापूर, पनवेल तसेच वांद्रे, गोरेगावकडे जाणाऱ्या अनेक लोकल सेवा रद्द राहणार आहे.परतीच्या फेऱ्यांवरही परिणाम होणार आहे. त्यामुळे हार्बर मार्गावरील प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल-कुर्ला यादरम्यान दर २० मिनिटांनी विशेष लोकल गाड्या चालविण्यात येणार आहेत. तसेच सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हार्बर मार्गावरील प्रवाशांना मेन लाईन व पश्चिम रेल्वेमार्गे प्रवास करण्याची विशेष मुभा देण्यात आली आहे.

# कुर्ल्यातील वसाहतीचा पुनर्विकास टॅक्सीचालकांची सोसायटी सज्ज

■ मुंबई

**कुर्ला** पश्चिम येथील एलबीएस मार्गावरील सुमारे ८.५ एकरांची मोठी मालमत्ता पुनर्विकासासाठी सज्ज झाली आहे. या जागेवर असलेल्या बॉम्बे टॅक्सीमेन को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या व्यवस्थापन समितीने या प्रकल्पासाठी 'सायेबा स्पेसेस प्रा. लि.' या बिल्डर कंपनीची निवड केली आहे.

या संकुलात २९ इमारती, ६५६ फ्लॅट आणि ३० दुकाने असणार आहे. ही गृहनिर्माण सोसायटी दिवंगत कामगार नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी बेघर टॅक्सीचालकांना निवारा देण्यासाठी सुरू केली होती. सुरुवातीला निधीअभावी गैर-टॅक्सीचालकांनाही येथे घरे देण्यात आली. १९७० च्या दशकात फर्नांडिस यांनी एलआयसीकडून कर्जासाठी अर्ज केला होता. मात्र इंदिरा गांधी यांनी लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात त्यांना अटक झाली. १९७७ साली निवडणुकांनंतर ते केंद्रीय मंत्री झाले आणि त्यांनी एलआयसीकडून कर्ज मंजूर करून घेतले. कालांतराने टॅक्सीचालकांनी आपले फ्लॅट विकले आणि आज या वसाहतीत सर्व रहिवासी गैर-टॅक्सीचालक आहेत.

दीर्घकाळचे रहिवासी यांच्या मते, २००५, २००८, २०१३ आणि २०१७ या चार वेळा पुनर्विकासाचे प्रयत्न झाले, पण विविध कारणांमुळे ते अपयशी ठरले. अलीकडे सोसायटीने निविदा काढल्यानंतर सायेबा स्पेसेस, रनवाल रिअल इस्टेट प्रा. लि. आणि चंदक डेव्हलपर यांची निवड झाली होती.

# 'सहकारी महाराष्ट्र'चे सोमवारी सहकार राज्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य सहकारी संघाचा १०७ व सहकारी महाराष्ट्राचा ६७ वर्षांचा वारसा असलेले सहकार चळवळीचे मुखपत्र 'सहकारी महाराष्ट्र'चे सोमवार २७ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता राज्याचे सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते प्रकाशन पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे व मुंबई जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर असणार आहेत.

मुंबई जिल्हा बँकेच्या फोर्ट येथील मुख्यालयातील पद्मश्री वसंतदादा पाटील सभागृहात पार पडणाऱ्या या प्रकाशन सोहळ्याला महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय मंडळ अध्यक्ष विद्याधर अनास्कर, राष्ट्रीय सहकारी संघाचे अध्यक्ष (दिल्ली) संजीव कुसाळकर, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे तज्ज्ञ संचालक शिवाजीराव नलावडे, मुंबई जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, आ. प्रसाद लाड, आ. सुनील राऊत, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे संचालक नंदकुमार काटकर, सहकारी संस्थांचे विभागीय सहनिबंधक शहाजी पाटील, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर फेडरेशनचे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजक राज्य सहकारी संघाचे उपाध्यक्ष अर्जुनराव बोरुडे, मानस सचिव रामदास मोरे, संचालक प्रकाश दरेकर, अनिल गजरे, नितीन बनकर, विष्णू घुमरे, जयश्री पांचाळ यांनी दिली.

# संगमनेरमध्ये भोंदूबाबा गडगेला अटक २०० व्हिडिओ आणि ९० औषधे जप्त

■ अहिल्यानगर

**नाशिकमधील** खरातचे प्रकरण उघडकीस आल्यापासून महाराष्ट्रातील अनेक भोंदूबाबांचा पर्दाफाश होत आहे. अहिल्यानगर पोलिसांनीही राजेंद्र बापू गडगेच्या भोंदूबाबावर गुन्हा दाखल करत त्याला काल रात्री अटक केली. पोलिसांनी त्याच्या आश्रमात झाडाझडती घेत आतापर्यंत २०० हून अधिक संशयास्पद व्हिडिओ जप्त केले आहेत. हे सर्व व्हिडिओ फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात येणार असून, त्यातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे.



संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील दत्तधाम आश्रमात सुरू असलेल्या अंधश्रद्धेच्या काळ्या कारभाराविरोधात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तक्रारी केली होती. या तक्रारीवरून गडगे बाबावर कारवाई करण्यात आली.

त्याच्या दत्तधाम आश्रमातून ९० हून अधिक संशयास्पद औषधे जप्त करण्यात आली असून, त्यांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले जाणार आहेत. गडगे हा कॅन्सरसारखे दुर्धर आजार मंत्रशक्तीने बरे करण्याचा दावा करत असल्याचे उघडकीस आले आहे.

# शिवसेना भवनातील बैठकीला संजय जाधव दुसऱ्यांदा गैरहजर

■ मुंबई

**उबाठा** गटाची आज शिवसेना भवन येथे झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत परभणीचे खासदार संजय जाधव पुन्हा अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत परभणी जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची ही बैठक पार पडली. यावेळी विनायक राऊत, अंबादास दानवे, मिलिंद नार्वेकर तसेच आमदार डॉ. राहुल पाटील आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. संजय जाधव यांच्या अनुपस्थितीमुळे पक्षांतर्गत मतभेदांच्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. पक्ष बदलाच्या शक्यतांदरम्यान त्यांनी काही केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेतल्याचीही चर्चा रंगत आहे.

'ऑपरेशन टायगर' या राजकीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. मात्र जाधव यांच्या गैरहजेरीमुळे त्यांच्या नाराजीच्या चर्चांना आणखी बळ मिळाल्याचे मानले जात आहे. जाधव यांनी अनुपस्थितीचे कारण नात्यातील लग्न समारंभ असल्याचे स्पष्ट केले आहे. तरीही त्यांच्या अनुपस्थितीमुळे बैठकीतील निर्णय प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# राज्यात उन्हाचा तडाखा वाढला

**राज्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून, विदर्भात उष्णतेचा प्रचंड तडाखा कायम आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याचा इशारा दिला आहे.**



## विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा

■ नागपूर

**गेल्या** काही दिवसांपासून विदर्भ विभागातील कमाल तापमानात सातत्याने वाढ होत आहे. अकोल्यात ४० अंशांपासून सुरू झालेला पारा चाळीसच्या वर जात आता ४५ अंशांवर पोहोचला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार अकोला, चंद्रपूर, नागपूर, वर्धा आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना दुपारी बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय भरपूर पाणी व द्रवपदार्थ सेवन करावे, डोक्यावर टोपी, छत्री किंवा ओला कपडा वापरावा, हलका व सैलसर पोशाख परिधान करावा, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना विशेष काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, मुंबई शहरातही उष्ण आणि दमट वातावरणाचा त्रास वाढला आहे. गेल्या दोन दिवसांपासून दमट उकाडा जाणवत असून, तापमान ३६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. येत्या काही दिवसांत तापमानात आणखी २ ते ३ अंशांनी वाढ होण्याची शक्यता आहे.

# बुलेट ट्रेन प्रकल्पात नागरिकांचे विस्थापन होणार नाही

## वसई-विरार महापालिकेची ग्वाही

■ वसई

**मुंबई**-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात स्थानिकांच्या जमिनी जाणार नाही. तसेच कुणीही विस्थापित होणार नाही, अशी ग्वाही वसई-विरार महापालिकेने दिली आहे. या ठिकाणी स्थानिकांच्या जमिनी भूसंपादीत न करता आरक्षणे बदलली जाणार असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे स्थानिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेचे (बुलेट ट्रेन) विरार स्थानक नालासोपारा पूर्वेच्या वालईपाडा येथे तयार केले जाणार आहे. या स्थानक परिसराचा विकास करण्यासाठी 'प्रोजेक्ट स्मार्ट' हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे. या व्यापारी केंद्राचा विकास करताना येथील साडेचारशे हेक्टर जागेवर जपानच्या धर्तीवर शहर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र या प्रकल्पामुळे स्थानिक विस्थापित होण्याची भीती व्यक्त करण्यात येत होती. यासंदर्भात शुक्रवारी ग्रामस्थांची पालिकेत बैठक संपन्न झाली. येथील १०० हेक्टर जागा वनजमिनीची आहे. येथील ग्रीन झोन (हरित पट्टा) असल्याने केवळ आरक्षण बदलून आर झोन (निवासी क्षेत्र) मध्ये बदलण्यात येईल. त्यामुळे कुणी विस्थापित होणार नाही, असे महापौर अजीव पाटील यांनी सांगितले. या परिसराचा विकास करण्यासाठी समूह पुनर्विकास (क्लस्टर) योजना राबविण्यात येणार आहे.

# बारामतीत पार्थ पवारांसमोरच पदाधिकाऱ्यांची धक्काबुक्की

**बारामती** - राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत खासदार पार्थ पवार यांच्या उपस्थितीतच पदाधिकाऱ्यांमध्ये जोरदार वाद झाला. या वादात पदाधिकाऱ्यांनी धक्काबुक्की केली. बारामतीतील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. बारामती शहरातील पदाधिकाऱ्यांची बैठक पार्थ पवार यांनी त्यांच्या सहयोग या निवासस्थानी बोलावली होती. या बैठकीत स्थानिक पातळीवरील संघटनात्मक प्रश्न, आगामी राजकीय रणनीती आणि कार्यकर्त्यांमधील समन्वय या मुद्द्यांवर चर्चा अपेक्षित होती. बैठकीदरम्यानच वातावरण तापले आणि आजी-माजी नगरसेवक तसेच काही पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली. वाद इतका वाढला की, काही पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना धक्काबुक्की केल्याचेही सांगितले जात आहे.